www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118




■ उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते...
पान ३ वर....

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ मुंबई किनारी रस्त्याची उत्तर वाहिनी सोमवारपासून...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २३० ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, २८ जानेवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# गुन्हे सिद्धतेकरिता 'मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन' सुरु करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## 'मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन'चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

● मुंबई, विशाल कारंडे :

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कायद्यानुसार ७ किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्ह्यांसाठी फॉरेन्सिक पुराव्यांचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. या सुधारणांचा एक प्रमुख भाग असलेली ' मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन' ची उपलब्धता महाराष्ट्रात सुरू करण्यात आली आहे. गुन्हे सिद्धतेकरिता अशी सुविधा सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

सह्याद्री अतिथीगृह गृह येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे फीत कापून आणि हिरवा झेंडा दाखवून लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यात एकूण २५९ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन सुरू करण्यात येणार आहे. त्यापैकी २१ पूर्णपणे सुसज्ज व्हॅन्स कार्यरत करण्यात आल्या आहेत. ब्लॉक चेन तंत्रज्ञानाचा वापर करून क्राईम सीन ॲप्लिकेशन गुन्हे स्थळावर तपासणी करणार आहे. यामध्ये पुरावे संग्रहित करून बारकोडद्वारे सुरक्षित करण्यात येणार आहे. गुन्ह्यांच्या उलगडा करण्यामध्ये फॉरेन्सिक सहाय्य पुरविण्यासाठी, पुरावे गोळा करणे व विश्लेषण करण्यासाठी ही व्हॅन उपयुक्त ठरणार आहे.या व्हॅनमध्ये रक्त, डीएनए संग्रहण आणि बलात्कारासारख्या गुन्ह्यात आवश्यक पुरावे गोळा करता येणार आहे. वैज्ञानिक तज्ज्ञ व सहाय्यक कर्मचारी व्हॅनमध्ये असतील. तसेच स्फोटक पदार्थ तपासणी, सायबर गुन्ह्यांमध्ये तपासणीसाठी विशेष फॉरेन्सिक किट्स उपलब्ध असणार आहेत. तसेच व्हॅन सीसीटीव्हीने सज्ज असून कनेक्टेड असणार आहे. पान २ वर






## () थोडक्यात ()



### उत्तराखंडमध्ये लागू झाला समान नागरी कायदा

**नवी दिल्ली :** उत्तराखंड राज्यात आजपासून समान नागरी कायदा लागू करण्यात आला आहे. असा कायदा लागू करणारे उत्तराखंड हे देशातील पहिले राज्य बनले आहे. गेल्या वर्षी ७ फेब्रुवारी रोजी उत्तराखंड विधानसभेने समान नागरी कायदा मंजूर केला होता. त्याची अंमलबजावणी आणि नियम तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या गठित समितीने १८ ऑक्टोबर रोजी आपला अहवाल सादर केला होता. दरम्यान देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी काही दिवसात उत्तराखंडला भेट देणार आहेत याआधी राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यात आला आहे.
हा कायदा लागू झाल्यानंतर आता राज्यात विवाह, लिव्ह-इन रिलेशनशिप आणि वारसा हक्का संबंधी काही नियम बदलले आहेत.
या कायद्यानुसार, विवाहित दाम्पत्याला सहा महिन्यांच्या आत त्यांच्या विवाहाची नोंदणी करणं बंधनकारक असणार आहे. इतकेच नाही तर लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये असलेल्या जोडप्यांना कायदा लागू झाल्यानंतर नोंदणी करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिला जाणार आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे सचिव शैलेश बगोली यांनी राज्यात यूसीसी लागू करण्यासंबंधीची घोषणा केली होती. तसेच त्यांनी हेही स्पष्ट केले होते की उत्तराखंडच्या बाहेर राहत असलेल्या राज्यातील नागरिकांना देखील हा कायदा लागू होणार आहे.

### प्रजासत्ताकदिनी तरूणांनी वेधले लक्ष ; प्रजासत्ताक दिनाचे बॅनर का नाहीत, भावी नगरसेवकांना सवाल



**अंबरनाथ :** 'वाढदिवसाला बॅनर, होर्डिंग कमी पडले असते मात्र लोकशाहीच्या उत्सवाचा एकही बॅनर नाही, कुठे आहेत भावी नगरसेवक ?', असा प्रश्न उपस्थित करणारे फलक घेऊन प्रजासत्ताक दिनी अंबरनाथमधील काही तरूणांनी लक्ष वेधले. गेल्या काही वर्षात कोणत्याही निमित्ताने फलकबाजी करण्यात कोणताही राजकीय पक्ष माग नसतो. मग प्रजासत्ताक दिनी हे सर्व राजकीय नेते, पदाधिकारी कुठे गेले असा प्रश्न या तरूणांनी उपस्थित केला. गेल्या काही वर्षात फलक, बॅनर किंवा होर्डिंग लावण्यासाठी कोणताही विषय वर्ज्य नाही. अनेकदा तर लहान मुलांचे बारसे, वाढदिवस, नवी कोरी घेतलेली गाडी, बैल, पाळीव प्राणी अशा सर्वांच्या महत्वाच्या दिनी बॅनर लावले जातात. राजकीय कुरघोडी करण्यासाठी काही दिवसांपूर्वी शिवसेनेच्या एका गटाने संपूर्ण शहरभर एका राजकीय घराण्यातील व्यक्तीचे वाढदिवसानिमित्त शहरभर बॅनर लावले होते. बॅनर लावणाऱ्या नेत्याचेही इतके बॅनर कधी लावले नसावेत, अशी प्रतिक्रिया नागरिक देत होते. मात्र असे असताना प्रजासत्ताक दिनानिमित्त आजी माजी नगरसेवक, इच्छुक नगरसेवक, भावी नगरसेवक अशा कुणाचेच बॅनर दिसले नाहीत. असे सांगत अंबरनाथमधील भारत डावरे, प्रशांत गिरबीडे आणि प्रथमेश कंबळे यांनी हातात फलक घेत प्रश्न उपस्थित केला.

# वक्फ बोर्ड विधेयकासंदर्भातल्या बैठकीत सत्ताधाऱ्यांच्या १४ सुधारणा मंजूर, विरोधकांच्या सर्व सुधारणा फेटाळल्या!

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



वक्फ दुरुस्ती विधेयकाला संयुक्त संसदीय समितीने (जेपीसी) मंजुरी दिली आहे. यात एकूण १४ बदल करण्यात आले आहेत. आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा अहवाल सभागृहात सादर केला जाईल.

सत्ताधारी भाजपचे जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर एकूण ४४ बदल प्रस्तावित करण्यात आले होते. यांतील बरेच बदल विरोधी पक्षांच्या खासदारांनीही सुचवले होते. मात्र, विरोधकांनी सुचवलेले बदल मतदानाद्वारे फेटाळण्यात आले आहेत. वक्फ दुरुस्ती विधेयकाची तपासणी करत असलेल्या संयुक्त संसदीय समितीने सोमवारी भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सदस्यांनी प्रस्तावित केलेल्या सर्व दुरुस्त्या स्वीकारल्या आहेत. पान २ वर

# म्हाडा कोकण मंडळाच्या घराकडे इच्छुकांची पाठ

## २२६४ घरांपैकी ७१३ घरांना शून्य प्रतिसाद

● मुंबई, विशाल पाटील




म्हाडाच्या कोकण मंडळाच्या २२६४ घरांसाठी ५ फेब्रुवारीला ठाण्यातील काशीनाथ घाणेकर नाट्यगृहात सोडत काढली जाणार आहे. त्यातील २२६४ घरांसाठी २४ हजार ९११ अर्ज दाखल झाले असले तरी २२६४ घरांपैकी तब्बल ७१३ घरांना एकही अर्ज दाखल झालेला नाही. म्हाडा गृहनिर्माण आणि १५ टक्के एकात्मिक योजनेतील घरांकडे इच्छुकांनी पाठ फिरविली आहे. मात्र त्याचवेळी खासगी विकासकांच्या घरांना अर्थात २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील घरांना मात्र अर्जदारांनी प्रचंड प्रतिसाद दिला आहे. २० टक्के योजनेतील ५९४ घरांसाठी तब्बल २३ हजार ५७४ अर्ज आले आहेत. एकूण प्राप्त अर्जांच्या ९० टक्क्यांहून अधिक अर्ज २० टक्क्यांतील घरांसाठी दाखल झाले आहेत. पान २ वर

# मराठीच्या मुद्द्यावरुन मनसे पुन्हा आक्रमक

## डिस्ने हॉटस्टारच्या कार्यालयात घुसले कार्यकर्ते; जोरदार राडा !

● मुंबई, राकेश गायकवाड :



मराठीच्या मुद्द्यावरुन मनसे पुन्हा आक्रमक झालेली पाहायला मिळत आहे. डिस्ने हॉटस्टारच्या ॲपवर क्रिकेट समालोचन मराठीत उपलब्ध नसल्याच्या मुद्द्यावरुन मनसेच्या कार्यकर्त्यांनी थेट कंपनीचं कार्यालय गाठलं आहे. मनसेच्या चित्रपट सेनेचे अध्यक्ष अमेय खोपकर, संतोष धुरी यांनी वरळी येथील हॉटस्टारच्या कार्यालयात जाऊन निषेध नोंदवला. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी देखील केली. पान २ वर

# महाराष्ट्रात 'जीबीएस'चा धोका वाढताच केंद्र सरकार 'अलर्ट' मोडवर!

● पुणे, अभिजित येरल्लू :



राज्यात गुइनेल बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. यामुळे गंभीर आरोग्य समस्या निर्माण झाली आहे. याची दखल केंद्र सरकारने घेतली आहे. महाराष्ट्रातील आरोग्याची ही समस्या हाताळण्यासाठी केंद्र सरकारने उच्चस्तरीय समिती नियुक्त केली आहे. या समितीत सात तज्ज्ञांचा समावेश असून, ही समिती राज्य सरकारला या आजाराच्या रुग्णांचे व्यवस्थापन आणि नियंत्रण यात मदत करेल. याचबरोबर राज्य सरकारच्या उपाययोजनांवरही ही समिती लक्ष ठेवेल, अशी माहिती सूत्रांनी दिली. राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णांची संख्या १०१ वर पोहोचली असून, त्यातील १६ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. रुग्ण आढळून आलेल्या परिसरात आरोग्य विभागाकडून २५ हजार ५७८ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

राज्यातील एकूण रुग्णांपैकी ६८ पुरुष आणि ३३ महिला आहेत. 'जीबीएस'च्या रुग्णसंख्येत मोठी वाढ झाली असून, पुणे ग्रामीणमध्ये ६२ रुग्ण, पुणे महापालिकेच्या हद्दीत १९, तर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत १४ रुग्ण आणि इतर जिल्ह्यातील ६ रुग्ण आहेत. दरम्यान सोलापूरमध्ये एका संशयित रुग्णाचा मृत्यू झाला आहे.पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जिल्हा प्रशासनाकडून बाधित भागांमध्ये तातडीने रुग्ण सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. 'जीबीएस'ची लक्षणे दिसून येणाऱ्या रुग्णांचा शोध आरोग्य विभागाची पथके घेत आहेत. पुणे महापालिकेने १५ हजार ७६१ घरांचे सर्वेक्षण केले असून, पिंपरी-चिंचवड महापालिकेने ३ हजार ७१९ आणि ग्रामीणमध्ये ७ हजार ०९८ अशा एकूण २५ हजार ५७८ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.आरोग्य विभागाने शीघ्र प्रतिसाद पथक स्थापन केले आहे.

या पथकाने रुग्णसंख्या जास्त असलेल्या भागांची पाहणी सुरू केली आहे. रुग्णांचे शौचनमुने आणि रक्तनमुने राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत पाठविण्यात येत आहेत. यातील काही रुग्णांचे तपासणी अहवाल आरोग्य विभागाला मिळाले असून, कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी आणि नोरोव्हायरसचा संसर्ग आढळून आला आहे. पान २ वर

# "गाव तेथे नवी एसटी धावणार, ५ वर्षांत २५ हजार स्वमालकीच्या लालपरी बसेस घेणार" - प्रताप सरनाईक

● ठाणे, रोहित जैसवार :



एस. टी. महामंडळाला स्वमालकीच्या दरवर्षी ५ हजार या प्रमाणे येत्या ५ वर्षांत २५ हजार नव्या लालपरी बसेस घेण्याच्या प्रस्तावाला उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी तत्वतः मान्यता दिली असून तसा प्रस्ताव लवकरात लवकर सादर करण्याच्या सूचना त्यांनी परिवहन विभागाला दिल्या आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. सन २०२५-२६ अर्थसंकल्पासाठी परिवहन विभागाची आढावा बैठक उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी बोलवली होती. यामध्ये एसटीच्या सद्यस्थितीची परिस्थिती मंत्री सरनाईक यांनी विशद केली. सध्या एसटी महामंडळाकडे केवळ १४ हजार ३०० बसेस असून त्यापैकी १० वर्ष पेक्षा जास्त जुन्या झालेल्या १० हजार बसेस आहेत. त्या पुढील ३-४ वर्षात प्रवासी सेवेतून बाद होतील. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, भविष्यात एसटीला आत्मनिर्भर होण्यासाठी स्वतः च्या बसेस घेणे आवश्यक आहे. त्यासाठी दरवर्षी ५ हजार नवीन लालपरी बसेस याप्रमाणे पुढील ५ वर्षांमध्ये २५ हजार लालपरी बसेस घेण्याची पंचवार्षिक योजना आम्ही आखली असून त्याला अर्थमंत्र्यांनी परवानगी द्यावी असा प्रस्ताव मांडला. अर्थमंत्री अजित पवार यांनी या प्रस्तावाची निकड लक्षात घेऊन तातडीने तत्वतः मान्यता दिली असून त्याबद्दल त्यांचे प्रताप सरनाईक यांनी आभार मानले.प्रताप सरनाईक पुढे म्हणाले की, दरवर्षी ५ हजार नवीन बसेस याप्रमाणे सन. २०२९ साली या २५ हजार बसेस व ५ हजार इलेक्ट्रिक बसेस याप्रमाणे ३० हजार बसेसचा ताफा एसटीकडे तयार असेल भविष्यात "गाव तिथे एसटी... मागेल त्याला बस फेरी..!" आपण देऊ शकतो. आनंद दिघे यांच्या जयंती निमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी २५ हजार स्वमालकीच्या लालपरी बसेस घेण्याच्या प्रस्तावाला तत्वतः मान्यता देऊन एसटी वर प्रेम करणाऱ्या लाखो सर्वसामान्य जनतेला गोड भेट दिली आहे. पान २ वर

# अवघ्या सात वर्षाची शर्विका बनली दुर्ग लिंगाण्याची वीरांगना

● अलिबाग, दिगंबर जाधव :



जागतिक विक्रमवीर आणि महाराष्ट्राची हिरकणी म्हणून प्रसिद्ध असलेली रायगड जिल्ह्यातील अलिबागची कन्या कु. शर्विका अमृता जितेन म्हात्रे हिने प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येलाच आणखी एक चमकदार कामगिरी केली आहे. लिंगाणा हा दुर्ग महाराष्ट्रातील सर्वात कठीण दुर्ग म्हणून ओळखला जातो. सह्याद्री डोंगररांगेतील पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या दुर्गम वाटेवर असलेला हा दुर्ग स्वराज्याचे कारागृह म्हणून देखील प्रसिद्ध आहे,या गडाच्या पायथ्याशी जाणारी वाट देखील थरारक आहे. परंतु या सर्व गोष्टींवर मात करत शर्विका ने ही मोहीम फत्ते केली आहे.या मोहिमेत तिच्यासोबत १६ गिर्यारोहकांचा देखील समावेश होता. पान २ वर

## संपादकीय

# कुलगुरुंची निवड आणि राजकीय हस्तक्षेप

शिक्षण क्षेत्रामध्ये सरकारी हस्तक्षेप हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. अलीकडे, केंद्रीय शिक्षणमंत्रालयाने प्रस्तावित केलेल्या नव्या नियमांचा मसुदा या क्षेत्रातील आणखी एक वादग्रस्त बदल म्हणून समोर आला आहे. यामध्ये विद्यापीठांमधील कुलगुरूंच्या निवडीसाठी शोध समितीचे अधिकार राज्यपालांच्या (कुलपती) कडे देण्याची तरतूद आहे. हे बदल शिक्षण क्षेत्रात राजकीय हस्तक्षेपाची दारे खोलण्यास कारणीभूत होऊ शकतात, असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे.

सर्वप्रथम, या प्रस्तावित नियमांचा उद्देश असं दिसतो की, विद्यापीठातील उच्चपदस्थ व्यक्ती, विशेषतः कुलगुरू, आपल्या विचारधारेशी जुळणाऱ्या असाव्यात. याचा अर्थ, प्रत्येक राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंची निवड केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली होईल, आणि त्यामध्ये त्याच्याशी सहमत असलेल्या विचारधारेचे व्यक्ती असावे, असा छुपा हेतू आहे. यामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये राजकीय हस्तक्षेपाची शक्यता वाढणार आहे, आणि त्याचे परिणाम देशाच्या उच्च शिक्षण संस्थांवर दिसू शकतात.

नवा मसुदा अत्यंत वादग्रस्त ठरला आहे, कारण तो राज्यपालांना (कुलपती) अधिकार देतो, जे राज्य सरकारच्या स्वायत्ततेला धक्का पोहोचवते. विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या निवडीसाठी संस्थेच्या शोध समितीचा अधिकार राज्यपालांकडे दिला जात आहे, ज्यामुळे राज्य सरकारांचा हस्तक्षेप नाकारला जातो. या बदलामुळे विद्यमान पद्धतीमध्ये असलेल्या पारदर्शकतेचा अभाव होईल, असे अनेकांचे म्हणणे आहे.

पूर्वी, कुलगुरू निवडीसाठी शोध समितीत विविध तज्ञांचा समावेश असायचा, ज्यात विदयापीठाच्या अधिकार मंडळातील सदस्य तसेच इतर क्षेत्रातील विशेषज्ञ असायचे. या पद्धतीने निवडीमध्ये राजकीय हस्तक्षेप कमी झाला होता. तथापि, नवीन प्रस्तावानुसार, शोध समितीच्या कामकाजावर केंद्र सरकारचा थेट प्रभाव असू शकतो, ज्यामुळे विद्यापीठे आपल्यासाठी अनुकूल उमेदवार निवडण्यासाठी दबावाखाली येऊ शकतात.

राजकीय हस्तक्षेपासंबंधी विरोधी पक्षांनी आवाज उठवला आहे. तमिळनाडू आणि केरळसारख्या राज्यांनी केंद्र सरकारला हे मसुदे मागे घ्यावेत, असे ठराव विधानसभेत मंजूर केले आहेत. बिहारमध्येही या मसुद्याला विरोध आहे. या विरोधामुळे हे मसुदे केंद्र सरकारला एक नवीन वादाच्या कक्षेत घेऊन जातात.

विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर होणारा हा हल्ला केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या धोरणातील एक महत्त्वपूर्ण घटक बनला आहे. यामुळे राज्य सरकारांचा हस्तक्षेप कमी होईल, आणि शिक्षण क्षेत्राचा केंद्रीकरण वाढेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. तसेच, याचा फायदा आपल्या पक्षाच्या 'आपल्या' व्यक्तींच्या नियुक्त्यांमध्ये होईल, असे दिसते. यामुळे शिक्षणक्षेत्रावर राजकीय नियंत्रण आणण्याचा एक लपवलेला हेतू असू शकतो.

कुलगुरू निवडीच्या संदर्भातील या बदलांमुळे एक गोष्ट स्पष्ट आहे - शिक्षण क्षेत्रात राज्यपालांचे (कुलपती) अधिकार वाढवून, केंद्रीय सरकार उच्च शिक्षण संस्थांवर अधिक नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणाऱ्या ज्ञानाच्या स्वरूपात बदल होण्याची शक्यता आहे, आणि 'आपल्या' विचारधारेला अधिक वाव मिळण्याची भीती निर्माण झाली आहे.

यावर विरोध करणारे राज्य, जसे की तमिळनाडू, केरळ, पश्चिम बंगाल, आणि महाराष्ट्र, या ठरावांद्वारे राज्यपालांकडून अधिकार घेऊन राज्य सरकारकडे किंवा मुख्यमंत्र्यांकडे त्यांचा हस्तांतरण करण्याच्या मागणीला चालना देत आहेत. यामुळे राज्य सरकारांना अधिक स्वायत्तता मिळेल आणि शिक्षण क्षेत्रावर केंद्राचे नियंत्रण कमी होईल.

समाप्तीला, या प्रस्तावित मसुद्यामुळे शिक्षण क्षेत्रात वाढता राजकीय हस्तक्षेप आणि केंद्रीकरण या मुद्द्यांवर गंभीर विचार होणे आवश्यक आहे. प्रत्येक राज्याने त्याच्या शिक्षण प्रणालीत स्वायत्ततेची जपणूक केली पाहिजे, आणि विद्यार्थ्यांना विविध विचारधारांच्या प्रभावातून मुक्तपणे शिक्षण घेण्याची संधी मिळाली पाहिजे.

-अनिकेत घनश्याम भंकाळ

## आजची चित्रोळी



एक गुणात्मक त्रयमूर्ति
मिरची ही जाणा !
हात लागून डोळ्याला
करते ठणाणा !!

मुकुंद कुलकर्णी, मुंबई

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या सांगता सोहळ्यात प्रा. प्रवीण दवणे यांचे व्याख्यान

■ ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांची प्रमुख उपस्थिती
■ ठाणे महापालिकेने आयोजित केलेल्या उपक्रमांची सांगता
■ शिक्षक, विद्यार्थी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण

ठाणे (२७) : ठाणे महानगरपालिकेने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने आयोजित केलेल्या उपक्रमांचा सांगता सोहळा आणि विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण कार्यक्रम मंगळवार, २८ जानेवारी रोजी दु. ३.३० वा. महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्ताने, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रवीण दवणे यांचे 'मराठी भाषेचे अभिजात सौंदर्य' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

ठाणे महापालिकेतर्फे दि. १४ जानेवारीपासून मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने निरनिराळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात प्रा. निर्मोही फडके यांचे व्याखान, ग्रंथ दिंडी, नवीन व जुन्या पुस्तकांचे प्रदर्शन यांचा समावेश होता. त्याचबरोबर, शालेय विद्यार्थ्यांसाठी काव्य वाचन, गद्य वाचन, वक्तृत्व आणि कथा कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तर, शिक्षक, महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी निबंध लेखन, हस्ताक्षर, शुद्धलेखन आणि वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धांचे पारितोषिक वितरण या सांगता सोहळ्यात होणार आहे. कार्यक्रमास ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

पारितोषिक वितरणानंतर, प्रा. प्रवीण दवणे यांचे 'मराठी भाषेचे अभिजात सौंदर्य' या विषयावर व्याख्यान होईल.

# होमिओपॅथी काळाची गरज ! - संचालिका श्वेता चेतन पावशे

दिवा (सुचित शिंदे) - हॅलो किड्स फेदर्स - दिवा या शाळेअंतर्गत संचालक श्री. चेतन पावशे यांच्या प्रयत्नाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत होमिओपॅथिक मेडिकल शिबिरास उत्कृष्ठ प्रतिसाद मिळाला.

२६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताकदिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांच्या लाडक्या आजीआजोबांसाठी तसेच इतर ज्येष्ठनागरिकांसाठी या शिबिराचे आयोजन केले होते. देवी सरस्वती आणि देवी धन्वंतरी यांना स्मरून उपक्रमाला सुरुवात झाली. महाराष्ट्रीयन संस्कृतीचा आदर्श आणि परंपरा जपताना, तसेच प्रत्येकाच्या शुभेच्छांसाठी आणि आशीर्वादासाठी औक्षण केले. मग प्रार्थना,ध्यान, योगा, झुंबा गाणे, साजरे संगीत, नृत्य, फोटो सेशन, आणि त्याचप्रमाणे, काहींनी आपल्या स्वतःच्या छंद जोपासत गायन, नृत्य, काव्यवाचन इत्यादी सादर केले. अशा अनेक गोष्टींनी हा उपक्रम अधिक आकर्षक बनला, यामुळे सांस्कृतिक विविधतेचे दर्शन तर घडलेच त्याचबरोबरीने एकत्र येण्याचा आणि सर्जनशीलतेला उत्साह देण्याचा एक अद्भुत अनुभवही निर्माण झाला.

सर्वांनी एकत्र मिळून एक नवे आणि आकर्षक वातावरण निर्माण केले, लाडके आजी-आजोबा एकाच वेळी खूप आनंदी आणि भावनिक झालेले, त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचं हसू होतं, पण त्याच वेळी त्यांच्या डोळ्यात पाणीही झळत होतं, त्यांच्या आयुष्यातील सर्व सुंदर क्षणांची आठवण करून दिली गेली, आणि त्यातल्या प्रत्येक क्षणाशी संबंधित भावना उचलल्या जात होत्या. ह्या सर्वांनीतर दिवसाची रंगत आणखी वाढवली. असा हा अनुभव सगळ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

या शिबिराचा ६० हून अधिक रुग्णांनी लाभ घेतला. हॅलो किड्स फेदर्स दिवा या शाळेमध्ये मोफत औषध उपचार सुविधा देण्यात आली. सचिन, सुभाषचंद्र प्रजापती, उमेश शर्मा, यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले असून डॉ. जयप्रकाश शुक्ला हे बहुमोल मार्गदर्शनखाली झाले. या शिबीराच्या दिवशी तपासणी व औषधे मोफत देण्यात आली.

या शिबीरामध्ये डॉ. जयप्रकाश शुक्ला जीवन नथानिएल (परिचर), डॉ. वर्षा घुले (परिचर), डॉ. सुरेश यादव (REPL फार्मा), डॉ. अभिमन्यू मिश्रा(भार्गव फायटोलाब), डॉ. महेंद्र प्रसाद (नवीन जीवन) इत्यादी होमिओपॅथीक तज्ञांनी रूग्णांवर तपासणी केली. यावेळी बोलताना सौ. श्वेता पावशे जमलेल्या सर्वांनाआव्हान करत म्हणाल्या, आजारांपासून कायमस्वरुपी मुक्ती मिळविण्यासाठी होमिओपॅथिक औषधांचा एकदा अनुभव घेऊन पहा...आजच्या जीवनशैलीत मानसिक ताणतणाव, प्रदूषण आणि चुकीच्या आहाराच्या सवयींमुळे अनेक नवीन आजार वाढत आहेत.

या परिस्थितीत होमिओपॅथी केवळ आजार बरा करण्यासाठी नाही, तर शरीर, मन आणि आत्म्याचे संतुलन राखण्यासाठी उपयुक्त ठरते. ही पद्धत सुरक्षित आणि परिणामकारक असून ती प्रत्येक व्यक्तीस निरोगी आयुष्याचा मार्ग दाखवते. आरोग्यासाठी होमिओपॅथी ही काळाची गरज आहे.आजच्या आधुनिक काळात वैद्यकीय क्षेत्राने मोठी प्रगती केली आहे तथापि अनेक आजारांच्या मुळाशी पोहोचून उपचार करण्यासाठी आणि दुष्परिणामांविणा आरोग्य सुधारण्यासाठी होमिओपॅथी हा एक प्रभावी पर्याय म्हणून समोर येत आहे.

होमिओपॅथीचा जन्म जर्मनीमध्ये झाला असला तरी याची प्रणाली भारतभर प्रसिद्ध झाली आहे. ही पद्धत केवळ रोगाचे लक्षण कमी करत नाही, तर रोगाच्या मूळ कारणांवर उपचार करते आणि शरीराची नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. इतर उपचार पद्धतींच्या तुलनेत होमिओपॅथी स्वस्त व सुलभ आहे."

हॅलो किड्स फेदर्स - दिवा शाळेच्या संचालिका सौ. श्वेता चेतन पावशे यांनी यशस्वी वैद्यकीय शिबिरासाठी डॉ. जयप्रकाश शुक्ला [(D.H.M.S.), M.D. (TM) कोलंबो सहयोगी प्राध्यापक साई होम. मेडिकल कॉलेज, दुगडफाटा]) आणि वर्षा घुले (परिचर), सुरेश यादव (REPL फार्मा), अभिमन्यू मिश्रा (भार्गव फायटोलाब), महेंद्र प्रसाद (नवीन जीवन) इत्यादी होमिओपॅथीक पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

## पान १ वरून...

### गुन्हे सिद्धतेकरिता 'मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन'...

त्यामुळे संबंधित पोलीस स्टेशनला सबंधित गुन्ह्याकामी गोळा केलेल्या पुराव्यांची माहिती देता येणे शक्य होणार आहे. ही एकत्र प्रणाली असून यामध्ये सुसज्ज मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन, फॉरेन्सिक किट्स, फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि क्राईम सीन ॲप्लिकेशन यांचा समावेश आहे. यामुळे पुरावे गोळा करण्याची प्रक्रिया अधिक कार्यक्षम आणि अचूक बनणार आहे. तपास यंत्रणा आणि फॉरेन्सिक तज्ञ यांच्यात उत्तम समन्वय साधला जाणार आहे. पुरावे नष्ट करणे, पुराव्यांशी छेडछाड करून आरोपींना शिक्षेपासून आता कुणीही वाचवू शकणार नाही. त्यामुळे गुन्हेगारांवर वचक बसणार असून गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण निश्चितच वाढणार आहे, असेही मुख्यमंत्री श्री फडणवीस यावेळी म्हणाले. कार्यक्रमाला राज्यमंत्री गृह (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव राधिका रस्तोगी, प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, महासंचालक (न्याय व तांत्रिक) संजय वर्मा, न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय संचालक डॉ. संगीता घुमटकर, उपसचिव राजेंद्र भालवणे, गृह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

**अशी काम करणार फॉरेन्सिक मोबाईल व्हॅन**

जेव्हा गुन्हा नोंदविला जातो, तेव्हा नियंत्रण कक्ष फॉरेन्सिक पथकाला सूचित करेल. फॉरेन्सिक पथक गुन्हे स्थळाला भेट देवून ते गुन्ह्याची माहिती नोंदवून क्राईम सीन ॲप्लिकेशनमध्ये अद्ययावत करतील. फॉरेन्सिक तज्ज्ञ गुन्ह्याच्या ठिकाणी छायाचित्रे आणि व्हिडिओच्या माध्यमातून दस्तऐवजीकरण करतील. तसेच वरिष्ठ तज्ज्ञांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संपर्क साधून पुराव्यांचे संकलन आणि तपासणी करून पुरावे पुन्हा तपासून सील केले करतील. त्यानंतर क्राईम सीन रिपोर्ट तयार करून पोलीस तपास अधिकाऱ्याकडे सुपूर्द केला जाईल.

### वक्फ बोर्ड विधेयकासंदर्भातल्या बैठकीत...

तर, विरोधी सदस्यांनी मांडलेल्या सर्व दुरुस्त्या फेटाळून लावल्या आहेत. बैठकीनंतर समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी पत्रकारांशी संवाद साधला. समितीने स्वीकारलेल्या सुधारणांमुळे कायदा अधिक चांगला आणि प्रभावी होईल, असे जगदंबिका पाल यांनी म्हटले आहे.

**विरोधकांचे आरोप -**

विरोधी पक्षाच्या खासदारांनी बैठकीच्या कामकाजावर टीका करत, पाल यांच्यावर "लोकशाही प्रक्रिया कमकुवत केल्याचा" आरोप केला आहे. पत्रकारांसोबत बोलतान टीएमसी खासदार कल्याण बनर्जी म्हणाले, "ही बैठक म्हणजे केवळ दिखावा होता. आमचे काहीही ऐकले गेले नाही. पाल यांनी हुकूमशाही पद्धतीने काम केले." दरम्यान, पाल यांनी हे आरोप फेटाळून लावत संपूर्ण प्रक्रिया लोकशाही पद्धतीनेच पार पडली आणि बहुमताने निर्णय घेण्यात आला, असे म्हटले आहे.

**४४ प्रस्तावांपैकी केवळ १४ बदल मंजूर -**

समितीसमोर बदलांसाठी एकूण ४४ प्रस्ताव सादर करण्यात आले होते, परंतु केवळ १४ प्रस्तावांनाच मंजुरी देण्यात आली. पाल म्हणाले, विरोधी सदस्यांनी विधेयकाच्या सर्व ४४ कलमांमध्ये शेकडो सुधारणा प्रस्तावित केल्या होत्या, परंतु त्या मतदानाद्वारे फेटाळण्यात आल्या.

**भाजपच्या सर्व १० प्रस्तावांना मंजूरी -**

बैठकीत भाजप खासदारांनी १० दुरुस्त्या सुचवल्या होत्या आणि सर्व दुरुस्त्या मंजूर करण्यात आल्या. याच वेळी, विरोधकांकडून अनेक दुरुस्त्यादेखील मांडण्यात आल्या, परंतु मतदानानंतर त्या सर्व फेटाळण्यात आल्या. विरोधकांनी मांडलेल्या सर्व दुरुस्त्या १०-१६ मतांनी फेटाळण्यात आल्या. तर, भाजपच्या सर्व दुरुस्त्या १६-१० मतांनी स्वीकारण्यात आल्या आहेत.

### म्हाडा कोकण मंडळाच्या घराकडे इच्छुकांची पाठ

कोकण मंडळाकडून २२६४ घरांसाठी ११ ऑक्टोबरपासून अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मूळ वेळापत्रकानुसार ही प्रक्रिया १० डिसेंबरपर्यंत होती तर २७ डिसेंबरला सोडत काढण्यात येणार होती. मात्र या विहित मुदतीत घरांना प्रतिसाद न मिळाल्याने सोडतीला दोनदा मुदतवाढ देण्यात आली. परिणामी सोडतीची तारीख दोनदा पुढे ढकलण्यात आली आणि आता मात्र अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया संपुष्टात आली असून आता ५ फेब्रुवारीला २२६४ घरांसाठी सोडत काढली जाणार आहे. प्रत्यक्षात या दिवशी २२६४ घरांपैकी १५५१ घरांसाठी सोडत निघणार आहे. कारण २२६४ घरांपैकी ७१३ घरांना शून्य प्रतिसाद मिळाला आहे. शून्य प्रतिसाद मिळालेल्या या घरांमध्ये १५ टक्के एकात्मिक योजनेसह म्हाडा गृहनिर्माण योजनेतील घरांचा समावेश आहे. १५ टक्के योजनोतील ८२५ घरांसाठी केवळ ४१७अर्ज दाखल झाले असून ४०८ घरांना प्रतिसाद मिळालेला नाही. तर म्हाडा गृहनिर्माण योजनेतील ७२८ घरांसाठी केवळ ४३४ अर्ज दाखल झाले असून ३०५ घरांना प्रतिसाद मिळाला आहे. दरम्यान २२६४ घरांच्या सोडतीतील ११७ भूखंडांसाठी १४७ अर्ज सादर झाले आहेत.

सोडतीतील १५ टक्के आणि म्हाडा गृहनिर्माण योजनेतील ७१३ घरांना प्रतिसाद मिळाला नसला तरी दुसरीकडे २० टक्के योजनेतील घरांना मात्र प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. २० टक्के योजनेतील ५९४ घरांसाठी तब्बल २३ हजार ५७४ अर्ज दाखल झाले आहेत. एकूण प्राप्त अर्जांच्या ९० टक्क्यांहून अधिक अर्ज २० टक्के योजनेतील घरांसाठी आले आहेत. त्यामुळे म्हाडाच्या घरांपेक्षा खासगी विकासकांच्या २० टक्के योजनेतील घरांकडे अर्जदारांचा कल असल्याचे स्पष्ट झाले आहे. म्हाडाच्या सोडतीतील घरांना प्रतिसाद मिळावा यासाठी मंडळाने विशेष मोहिम राबवली, जाहिरात केली, मात्र त्यानंतरही म्हाडाच्या घरांना प्रतिसाद मिळालेला नाही. त्या अनुषंगाने कोकण मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सोडतीच्या प्रतिसादासंबंधी विचारणा केली असता त्यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

### मराठीच्या मुद्द्यावरुन मनसे पुन्हा आक्रमक

कंपनीचे वरिष्ठ अधिकारी भेट देत नसल्याने काही काळ वातावरण तापलं होतं. पण पोलीस फौजफाटा उपस्थित असल्यानं परिस्थिती हाताबाहेर गेली नाही. पोलिसांनी वेळीच परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. अमेय खोपकर यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन लवकरात लवकर ॲपवर मराठीत समालोचन उपलब्ध करुन द्यावं असं ठणकावून सांगितलं. "महाराष्ट्रात राहून इथे व्यवसाय करुन डिस्ने हॉटस्टारच्या ॲपवर क्रिकेटचं समालोचन हिंदी, गुजराती, मल्याळी, तेलुगु, भोजपुरी या सगळ्या भाषांमध्ये उपलब्ध आहे. पण मराठीत उपलब्ध नाही. हे अजिबात चालणार नाही. ही समज नाही तर धमकी समजा. पण मराठीत समालोचन तातडीने उपलब्ध झालं पाहिजे. नाहीतर डिस्ने हॉटस्टारच्या कार्यालयाच्या काचा खूप महाग आहेत हे लक्षात ठेवा", असा आक्रमक पवित्रा यावेळी अमेय खोपकर यांनी घेतला.

**अधिकारी भेट देत नसल्यानं राडा**

मनसेचे पदाधिकारी हॉटस्टारच्या अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी गेले असता बराच वेळ कुणी भेटायला तयार होत नसल्याने कार्यालयात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. पदाधिकाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. धमकीवजा इशारा दिल्यानंतर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना भेट दिली. यात अमेय खोपकर यांनी निवेदन देत तातडीने मराठीत समालोचन उपलब्ध करुन देण्याच्या सूचना केल्या आहेत.

### महाराष्ट्रात 'जीबीएस'चा धोका वाढताच केंद्र...

याचबरोबर पुण्यातील विविध भागांतील पाण्याचे नमुने रासायनिक आणि जैविक तपासणीसाठी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. आर्थिक मदत करणार पुण्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमची (जीबीएस) रुग्णसंख्या वाढली असून, त्यातील निम्मे रुग्ण गंभीर आहेत. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. यामुळे या रुग्णांच्या उपचारांचा सरासरी खर्च ५ लाख रुपयांहून अधिक होत आहे. राज्य सरकारच्या महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेतून या आजारावर उपचार होत आहेत. आता पुणे महापालिकाही शहरी गरीब योजनेतून गरीब रुग्णांच्या उपचाराचा खर्चात योगदान देणार आहे.

### "गाव तेथे नवी एसटी धावणार, ५ वर्षांत २५...

याबद्दल मी त्यांचा शतश: आभार आहे, असे प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे. दरम्यान, एसटीच्या भाडेवाढीवरून विरोधकांनी महायुती सरकारवर टीका करण्यास सुरुवात केली आहे. एसटी भाडेवाढ तात्काळ मागे घेतली पाहिजे. मंत्र्यांनी तसे आदेश काढले पाहिजे. दरवाढ मंत्र्यांनी केली नाही मग केली कोणी? मंत्र्यांनी आणि उपमुख्यमंत्र्यांनी दरवाढ विरोध आहे तर दरवाढ मागे घ्यावी आणि दरवाढ मंत्र्यांनी केली नाही तर हे खाते चालवते कोण? अधिकारी जर खाते चालवतात, हा पोरखेळ आहे. हा निर्णय अधिकाऱ्यांनी घेतला असेल तर मग त्यांच्यावर कारवाई करणार का? अंगलट आला की अधिकाऱ्यांनी केलं आणि चांगल काही झाले की श्रेय घ्यायचे अशी दुटप्पी भूमिका सरकारची आहे, या शब्दांत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी निशाणा साधला.

### अवघ्या सात वर्षाची शर्विका बनली दुर्ग...

अश्या कठीण गडांच्या मोहिमेसाठी शर्विका राजे शिवाजी वॉल क्लाइंबिंग,पुणे या संस्थेच्या माध्यमातून अमोल जोगदंड आणि मांतू मंत्री या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाने गेल्या दोन वर्षापासून सातत्याने प्रशिक्षण घेत आहे या प्रशिक्षणामुळेच तिला या मोहिमेत आत्मविश्वास मिळण्यास मदत झाली तसेच एस एल ॲडव्हेंचर,पुणे या संस्थेच्या माध्यमातून एवरेस्ट वीर लहू उघडे यांच्या माध्यमातून या मोहिमेचे आयोजन केले होते.याच संस्थेतील गिर्यारोहक तुषार आणि केदार यांच्या माध्यमातून ही मोहीम विविध सुरक्षा उपकरणांच्या साहाय्याने यशस्वीपणे पार पडली. या मोहिमेनंतर पुन्हा एकदा शर्विकाने आपले नाव सह्याद्रीच्या प्रवासात अधोरेखित केले आहे त्यामुळे तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)



आज प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य सोहळ्यात "उत्कृष्ट अधिकारी" म्हणून उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्हा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभ हस्ते प्रशस्तिपत्र देवून गौरविण्यात आले. मात्र या यशात माझे सर्व वरिष्ठ अधिकारी, सहकारी अधिकारी कर्मचारी तसेच प्रसारमाध्यम क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचाही मोलाचा वाटा आहे. आपल्या सर्वांच्या मार्गदर्शन, सहकार्याशिवाय हे शक्य नव्हते. याचबरोबर माझ्या कुटुंबियांची मला आजपर्यंत मिळालेली "खंबीर साथ, त्यांचा त्याग" आणि आपल्या सर्वांचा आशिर्वाद, शुभेच्छा मी कधीही विसरू शकत नाही. मी आपल्या सर्वांचाच कायम ऋणी आहे.



ठाणे - मानकोली येथील एस. एस. अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था येथे २६ जानेवारी रोजी, चिमुकल्यांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांनी एकत्र येऊन गणतंत्र दिवस साजरा करताना संविधानाचा मान राखण्याचा आणि एक आदर्श संस्था म्हणून कार्यरत राहण्याचा प्रण घेतला.

# उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी ठाणे येथे ध्वजारोहण संपन्न

## पायाभूत सुविधा, रस्ते विकास, शेती प्रगती, सामाजिक अन् आरोग्य क्षेत्रातील सुधारणांमध्ये ठाणे जिल्हा अग्रेसर राहिल्याचे समाधान - उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे (रोहित जैसवार)** - आज आपण जेव्हा महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करतो, त्यावेळी मुंबई महानगर आणि विशेषतः ठाणे जिल्ह्याचा विशेष उल्लेख करावाच लागतो. एक सर्वसामान्य शिवसैनिक ते महाराष्ट्राचा मुख्यमंत्री या प्रवासात ठाणे जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याची जबाबदारी मी पार पाडली याचे समाधान आहे. देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अडीच वर्षात ठाणे जिल्ह्याला चांगले प्रोजेक्ट्स मिळाले. त्यांच्या हस्ते अनेक चांगल्या प्रकल्पांचं लोकार्पण आणि भूमीपूजन होऊ शकले. पायाभूत सुविधा, रस्त्यांचा विकास, शेतीची प्रगती, सामाजिक आणि आरोग्याच्या सुधारणा अशा सर्व क्षेत्रांमध्ये ठाणे जिल्हा अग्रेसर राहिला याचे समाधान वाटते, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.



७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या पोलीस क्रीडा संकुल, साकेत मैदान, ठाणे येथील मुख्य शासकीय सोहळ्याप्रसंगी उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, रविंद्र फाटक, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, कल्याण स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी माधवी सरदेशमुख, पोलीस सह आयुक्त डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण, पोलीस अधीक्षक डॉ.डी. स्वामी, नगरपालिका प्रशासन संचालनालयाचे संचालक मनोज रानडे, महाराष्ट्र रस्ते विकास प्राधिकरणाच्या सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.वैदेही रानडे, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये, अपर पोलीस आयुक्त विनायक देशमुख, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी (सर्वसाधारण) हरिश्चंद्र पाटील, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्केपाटील, मल्लिकार्जून माने, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, ठाणे प्रांताधिकारी उर्मिला पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख बाबासाहेब रेडेकर, जिल्हा राष्ट्रीय सूचना व विज्ञान अधिकारी नरेंद्र भामरे, पोलीस उपायुक्त अमरसिंह जाधव, पराग मणेरे, मीना मकवाणा, पंकज शिरसाठ, शशिकांत बोराटे, शेखर बागडे, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार, डॉ.अर्चना पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, प्रमोद काळे, संजय बागूल, जिल्हा हिवताप अधिकारी संतोषी शिंदे, सहायक पोलीस आयुक्त प्रिया ढाकणे, तहसिलदार डॉ.आसावरी संसारे, संदीप थोरात, रेवण लेंभे, उज्वला भगत, उमेश पाटील, नायब तहसिलदार दिनेश पैठणकर, राहुल सूर्यवंशी, सहाय्यक अभियंता कल्याणी पाटील, जिल्हा प्रशासनातील इतर अधिकारी-कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम पोलीस दलाच्या पथकाने राष्ट्रीय ध्वजास मानवंदना दिली तसेच यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीताची धून वाजविण्यात आली.

देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यातल्या जनतेला हार्दिक शुभेच्छा देताना उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अन्य महान समाजसुधारकांना अभिवादन करून म्हणाले की, भारत नावाच्या प्रजासत्ताकात आपण सगळे जन्मलो. इथे लोकशाही आहे. प्रजेची सत्ता आहे. २६ जानेवारी १९५० रोजी आपला देश प्रजासत्ताक म्हणून घोषित झाला. लोकशाहीत प्रजेची सत्ता सर्वोपरि असते. निवडून येणारे नेते येतात, सत्तेच्या खुर्चीत बसतात. मान-सन्मान मिळतो. पण हे सगळे जनतेनेच ठरविलेले असते. तू त्या खुर्चीत बस आणि आमची कामं कर, असा आदेश सत्तेवर असलेल्या प्रजेने दिलेला असतो. सत्ताधारी हे फक्त सत्तेचे विश्वस्त असतात ट्रस्टी! जनतेने त्यांना दिलेले कर्तव्य बजावून शांतपणे दूर व्हायचे, हे ठरलेले असते. प्रजासत्ताकात प्रजा आधी येते, मग सत्ता येते, हे आपण कायम लक्षात ठेवले पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, नुकताच लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव देशात आणि राज्यातही पार पडला. नागरिकांनी राष्ट्रीय कर्तव्याच्या भावनेतून मतदान केले. भारतासारख्या सार्वभौम राष्ट्रामध्ये पारदशी आणि नियोजनबद्ध निवडणुका होणे, हा लोकशाही यंत्रणेवरचा विश्वास अधिकाधिक वाढविणारा आहे.

# जिल्हा परिषद, ठाणे येथे भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा

**ठाणे (सम्यक कासारे)** - भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७६ वा वर्धापन दिनानिमित्त आज, जिल्हा परिषदच्या प्रांगणात मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत राष्ट्रगीत तसेच प्रजासत्ताक दिनाचा जयघोष करण्यात आला.





राज्यगीत व ध्वजगीत सादरीकरण करून वातावरण प्रसन्न झाले. तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी भारताचे संविधान प्रास्ताविका वाचन केले, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे तंबाखू मुक्तीची शपथ देखील घेण्यात आली. जिल्हा परिषद अंतर्गत सर्व वाहनचालक कर्मचारी यांच्यासाठी तयार करण्यात आलेल्या कार्यालयाचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. तदनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी उपस्थित सर्व अधिकारी-कर्मचारी वर्गास प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग प्रमुख संदिप चव्हान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, महिला व बाल विकास विभाग प्रमुख संजय बागुल, बांधकाम विभाग प्रमुख संदिप चव्हाण, जिल्हा कृषी अधिकारी एम. एम. बाचोटीकर, लघुपाट बंधारे विभाग प्रमुख दिलीप जोकार, पशुसंवर्धन विभाग प्रमुख डॉ. समीर तोडणकर, सर्व विभाग प्रमुख तसेच अधिकारी-कर्मचारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वंचित घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटीबद्ध - पालकमंत्री गणेश नाईक

**पालघर (सुचिता सोनावणे) :-** केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या विविध लोक उपयोगी योजना मार्फत वंचित घटकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासन कटीबद्ध असल्याचे वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले. नेटाळी येथे ॲग्रीस्टॅक योजना शिबिराच्या उदघाटनप्रसंगी पालकमंत्री गणेश नाईक बोलत होते. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जि. प. सदस्य निता पाटील, उपविभागीय अधिकारी सुनिल माळी, तहसीलदार रमेश शेंडगे, जिल्हा कृषि अधिकारी निलेश भागेश्वर, शेतकरी





बांधव उपस्थित होते. श्री. नाईक पुढे म्हणाले की महसूल विभाग ,कृषी विभाग, आणि ग्रामविकास विभाग या तीन खात्याच्या माध्यमातून ॲग्रीस्टॅक योजना प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये राबविली जाणार आहे या योजनेच्या माध्यमातून शेतकरी व त्यांच्या जमिनी, शेतात घेतलेली हंगामी पिके आणि त्यांच्या शेताचे भौगोलिक स्थान ही माहिती एकत्र करून कृषी विषयक इतर संसाधनांचा वापर योग्य रीतीने करणे व आर्थिक योजनांचा लाभ देण्यासाठी केंद्र व राज्य शासन पुरस्कृत पारदर्शक प्रणाली. ज्यामधे शेतकऱ्याची ओळख (फार्मर आयडी) निश्चित केली जाणार आहे.

# युवकांनी खेळाच्या मैदानाशी मैत्री केल्यास ते वाईट मार्गापासून दूर राहतील - आ. रविंद्रजी चव्हाण



**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण )** - टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ, डोंबिवली यांच्या एमआयडीसी परिसरातील खेळाच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या लोकमान्य गुरुकुल क्रीडा संकुल याचे उद्घाटन डोंबिवलीचे लोकप्रिय आमदार, भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष मा. श्री. रवींद्रजी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.


" डोंबिवलीतील युवकांनी खेळाच्या मैदानाशी मैत्री केल्यास युवक हे वाईट संगतीत सापडणार नाहीत व नशा किंवा अन्य वाईट मार्गापासून दूर राहतील ," असे श्री. रवींद्र चव्हाण म्हणाले.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला डोंबिवलीकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. "हे क्रीडा संकुल केवळ व्यावसायिक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन सुरू केले नसून येथे फुटबॉल, क्रिकेट आणि बास्केटबॉल या क्रीडा प्रकारांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे येथून खेळाडू निर्माण होतील व डोंबिवलीचे नाव उज्ज्वल करतील," असे प्रतिपादन मा. आ. श्री. चव्हाण यांनी केले. सुमारे अठरा हजार चौ. फूट. इतक्या मोठ्या आकाराचे टर्फ, क्रिकेट साठी तीन खेळपट्ट्या तसेच बास्केटबॉल आणि पिकलबॉल या खेळांच्या सुविधा येथे विकसित करण्यात आल्या आहेत. कल्याण ग्रामीणचे नवनिर्वाचित आमदार मा. श्री. राजेशजी मोरे हे ही विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

# ५८ व्या निरंकारी संत समागमाची यशस्वीरीत्या सांगता

## जीवनाचा उद्देश केवळ भौतिक उपलब्धि नसून आत्मिक उन्नतीमध्ये निहित आहे - सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज

**कल्याण (गणेश बागडे) :** जीवनाचा उद्देश केवळ भौतिक प्रगतीमध्ये नसून आत्मिक उन्नतीमध्ये निहित आहे.'' असे उद्गार निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी महाराष्ट्राच्या 58व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या समापन दिवशी लाखोंच्या संख्येने उपस्थित मानव परिवाराला संबोधित करताना व्यक्त केले. या तीन दिवसीय संत समागमाची रविवारी रात्री विधिवतपणे यशस्वीरित्या सांगता झाली. या संत समागमामध्ये महाराष्ट्रासह देश-विदेशातून लाखो लोकांनी भाग घेतला. सतगुरु माताजी पुढे म्हणाल्या, मानवी जीवन एवढ्याचसाठी श्रेष्ठ मानले गेले आहे, की या जीवनात आत्मज्ञान प्राप्त करण्याची क्षमता आहे. परमात्मा निरकार असून या परमसत्याला जाणणे हेच मनुष्य जन्माचे परम लक्ष्य होय. शेवटी, सतगुरु माताजींनी सांगितले, की जीवन एक वरदान असून ते परमात्म्याशी क्षणोक्षणी संलग्न राहून जगायला हवे. क्षणोक्षणी जीवन योग्य दिशेने व्यतीत केल्याने आपल्याला आत्मिक शांती मिळू शकते आणि आम्ही अनंताच्या दिशेने अग्रेसर होऊ शकतो. निरंकारी समागमाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी एक भव्य सेवादल रॅली आयोजित करण्यात आली ज्यामध्ये हजारोंच्या संख्येने महिला व पुरुष स्वयंसेवकांनी आपापल्या खाकी व निळ्या वर्दीमध्ये सुसज्जित होऊन भाग घेतला. या रॅलीमध्ये मिशनच्या शिकवणूकीवर आधारित लघुनाटिकांचे सादरीकरण सेवादल सदस्यांकडून करण्यात आले ज्यांच्या माध्यमातून भक्तीमध्ये सेवेचे महत्व अधोरेखित करण्यात आले.



महाराष्ट्राच्या विविध भागातील, जसे कोकण, मराठवाड़ा, खान्देश, विदर्भ, मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्र येथील सेवादल यूनिट्सनी या रॅलीमध्ये प्रेरणादायक प्रस्तुती सादर केल्या. समागमाच्या तिसऱ्या दिवशी एका बहुभाषी कवि दरबारचे आयोजन करण्यात आले ज्याचे शीर्षक होते 'विस्तार - असीम की ओर।' महाराष्टा व्यतिरिक्त देशाच्या विविध भागातून आलेल्या एकंदर २१ कवींनी मराठी, हिन्दी, इंग्रजी, कोंकणी, भोजपुरी आदि भाषांच्या माध्यमातून काव्य पाठ करत मिशनचा दिव्य संदेश प्रसारित केला. श्रोत्यांनी या कवि दरबाराचा भरपूर आनंद लुटण्याबरोबरच कवि सज्जनांचे कौतुक केले. या समागमात 'विस्तार-असीम की ओर' या मुख्य विषयावर आधारित निरंकारी प्रदर्शनी श्रोत्यांसाठी विशेष आर्कषणाचे केंद्र बनून राहिली. या प्रदर्शनीचे मुख्यतः दोन भागांमध्ये विभाजन करण्यात आले होते. प्रथम भागात मिशनचा इतिहास, विचारधारा आणि सामायिक उपक्रमांच्या व्यतिरिक्त सतगुरुंनी देश व विदेशांमध्ये केलेल्या मानव कल्याण यात्रांची सचित्र माहिती देण्यात आली होती तर दुसÚया भागात संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन मार्फत राबविल्या जाणाÚया सामाजिक कार्याची माहिती दर्शविण्यात आली होती. त्यामध्ये प्रामुख्याने संपूर्ण भारतात राबविला जात असलेला प्रोजेक्ट वननेस वन तसेच प्रोजेक्ट अमृत हे उल्लेखनीय होते. या शिवाय निरंकारी इंस्टिट्यूट ऑफ म्युझिक ॲन्ड आर्ट्स प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्याचे दिसले.

समागमामध्ये काईरोप्रॅक्टिक थेरपी द्वारे निःशुल्क उपचार करण्याचे शिबिर आयोजन करण्यात आले होते. ही थेरपी मुख्यत्वे पाठीच्या कण्याच्या विकारांशी निगडित आहे. या तंत्राने उपचार करणारी ऑस्ट्रेलिया, यूनायटेड किंगडम, फ्रांस, अमेरिका येथील १८ डॉक्टरांची टीम आपल्या निष्काम सेवा प्रदान करत होती. यावर्षी जवळपास 3500 लोकांनी या थेरपीद्वारे उपचाराचा लाभ घेतला. समागम स्थळावर एक 60 बेडचे हॉस्पिटल तयार करण्यात आले होते ज्यामध्ये आपत्कालीन परिस्थितीत आयसीयूची सुविधाही उपलब्ध होती. या व्यतिरिक्त तीन ठिकाणी निःशुल्क होमियोपॅथी व डिस्पेन्सरींची व्यवस्था करण्यात आली होती.

# लक्ष्मण उतेकरांचा छावा इतिहास घडवणार


**अचाट धैर्य,अजोड पराक्रम,असामान्य शौर्य गाजवणारेरणधुरंदर,धर्मवीर छत्रपती संभाजी राजांना मानाचा त्रिवार मुजरा !**
**फाड देंगेमुघलसल्तनत की छाती अगर मराठा साम्राज्य के विरुद्ध सोचने की जरुरत की... हमशोर नही करते, सिधा शिकार करते है..!**
**अग्नि भीवो, | पाणी भीवो, ||**
**तुफान भीवो, | शेर शिवरायांचा छावा हैवो||**

राजे छत्रपती शिवरायांचे रयतेचे हिंदवीस्वराज्य आणि राजाभिषेक ज्या भूमीत स्थापन झाले आणि नरवीरतान्हाजीमालुसरे यांच्या कर्तृत्ववाने रक्ताने लाल झालेल्या महाड - पोलादपूरच्या भूमीत जन्म झालेल्या लक्ष्मण उतेकर यांचा स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी राजे यांच्या महापराक्रमाचा वेध घेणारा छावा हा चित्रपट येत आहे.

ज्या खोऱ्यातील मावळ्यांनी शिवरायांना प्रसंगी जीवाचे बलिदान देत साथ दिली त्या मावळ्यांचा वारसा लक्ष्मण उतेकर यांना लाभला आहे. उतेकरांच्या रक्तात 'शौर्य आणि निष्ठा' हा रक्तगट असल्यामुळे आणि इतिहासावर असलेल्या वेडापायीएव्हढे मोठे धाडस त्यांनी केले आहे. कॅमेराअटेंडंट ते सुपरस्टारसिनेमॅटोग्राफर असा लक्ष्मण उतेकर यांचा प्रवास आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील छायांकन क्षेत्रामधील सध्याचं हे आघाडीचं नाव आहे. "छावा" चाट्रेलरप्रदर्शित झाला आहे, आणि हा चित्रपट खरोखरच भव्यदिव्य वाटतो आहे. अंगावर शहारे आणणारे दृश्यांनी भरलेला हा ट्रेलर पाहून थक्क व्हायला होतं. थिएटरमध्ये फर्स्ट डे फर्स्ट शो पहायचा आहे. मराठ्यांच्या इतिहासातील छत्रपती संभाजी महाराजांची कारकीर्द हे मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या कालखंडातील एक तेजस्वी पर्व मानले जाते. अचाट धैर्य, अजोड पराक्रम, असामान्य शौर्य गाजवणारेरणधुरंदर,धर्मवीर छत्रपती संभाजीधर्माभिमानी, स्वराज्यरक्षक, सकलशास्त्र पारंगत, उत्तम राजनीतिज्ञ, परमप्रतापी आणि धर्मासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे छत्रपतीसंभाजी महाराज स्वराज्याची धुरा सांभाळणारे धाकले धनी. महापराक्रमी छत्रपती संभाजी महाराजांनी वीरतेने स्वराज्याचे रक्षण केले आणि पुढच्या काळातील स्वाभिमानाच्या लढाईला प्रेरणा दिली. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर आलमगीरऔरंगझेब तत्कालीन जगाच्या सारीपाटावर पहिल्या पाच शक्तीशालीसम्राटांमधेगणला जायचा. मराठी राज्य जिंकण्याच्या ईर्षेने तो २७ वर्षे महाराष्ट्रात लढला छत्रपती राजाराम महाराज्यांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्राच्या गादीवर राजा नव्हता.परंतुसंभाजीराजांच्या बलिदानापासून स्फूर्ती घेऊन मराठा मावळा तडफेनेताराराणी यांच्या नेतृत्वाखाली त्याच्याशी लढला.आणि त्याचा शेवट देखील इथेच झाला हे आपण जाणतोच. संभाजीराणांचे शौर्य आणि बलिदान तेव्हाही आणि आजही आपल्याला याचमुळे प्रेरित करते. मौत डरी थीदेखकर उसे ये खुदमौत का दावा है।

धरती कोनाज़है जिस पर ऐसा शेर "शिवबा" का छावा है।।

छत्रपती संभाजी महाराजांनी सहन केलेला त्रास इतका भयानक आहे त्यामुळे तेवढा आदर जास्त आणि म्हणून ते तितकंच ताकदीने मांडलं पाहिजे ही अपेक्षा असते. आम्हांलाशंभूराजे कळलेच नव्हते. जे दुर्गुण




कळले होते ते त्यांच्यात नव्हतेच. जे सद्गुण त्यांच्यात होते ते कुणी सांगितलेच नाहीत. लक्ष्मण उतेकर यांनी इतिहासाचा अभ्यास करून धाडसाने हा प्रयत्न केला आहे, याबद्दल त्यांचे नरवीरांचा वंशज 'मालुसरे' म्हणून मनापासून अभिनंदन!

"छावा" चित्रपटातील नाचाला आक्षेप कशासाठी ? काळाच्या ओघात या मराठी मातीतले अनेक जिव्हाळ्याचे पुर्वापार परंपरेचे मराठमोळे संचित आपण हरवत व विसरत चाललो आहोत, जो नाच दाखवला आहे तो खेड्यापाड्यातला मराठमोळा लेझीम नाच आहे .... हल्ली कॉन्व्हेंट शाळेत जाणाऱ्यांनी हा नाच पाहिलाच नसेल किंवा लेझीम वस्तू कशी असते हे माहितही नसेल.... धुरळा उडवत अंगाचे मर्दन आणि घाम गाळत अंगात रग असलेला महाराष्ट्रातला रांगडा गडी हा नाच करतो...या नाचाला पूर्वापार महाराष्ट्राची ओळख आणि इतिहास आहे... धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना बदनाम करणारे मराठी साहित्य आणि कलाकृती आजही महाराष्ट्रात अनेक दशकांपासून आहे. आणि ते निर्माण करणारे आजही आपल्या मतावर ठाम आहेत. वा सी. बेंद्रे, सु. ग. शेवडे, कमल गोखले, इंद्रजित सावंत, जयसिंगराव पवार, बानूगडे पाटील असे अभ्यासक ज्यांनी संभाजी राजांची उजवी बाजू उजेडात आणली नसती तर..... खोटा इतिहास सांगणाऱ्यांच्या मागे जो समाज झुंडीने उभा आहे तो मस्तक गहाण ठेवून अधिक गर्दीने उभा राहिलेला दिसला असता. आयुष्यात एकही लढाई न हरलेल्या राजाचा पराक्रमी इतिहास मोठ्या पडद्यावर यावा अशी शिवप्रेमीची इच्छा होतीच. धर्माच्या - प्रांताच्या - जातीच्या भिंती अलीकडे मोठ्या प्रमाणात उभ्या केल्या जात असताना, कुणी परप्रांतीय निर्माता मराठ्यांच्या राजाचा पराक्रम दाखवण्याचे एव्हढे धाडस कशाला करील. मराठा माणूसच धाडसाने अटकेपार भगवा ध्वज फडकविण्याचे धाडस करू शकतो. आणि अलीकडच्या काळात सर्व क्षेत्रात आपला दबदबा निर्माण करू शकतो.

हा चित्रपट हिंदीत येत असल्याने काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत सर्व प्रांतात सर्व धर्मात सर्व जातीत पाहिला जाईल याचा आनंद मराठी माणसांना अगोदर असायला हवा..... "लक्ष्मण उतेकर" नावाचा मराठी आणि मराठा माणूस करोडोरुपये खर्च करून हे धाडस करतो आहे. दोन तासाचा चित्रपट २ मिनिटांचा ट्रेलर पाहून कसा कळणार. काहीवेळाव्यक्तीरेखा सशक्त करण्यासाठी किंवा पटकथा पुढे जाण्यासाठी वा कलाकृती कंटाळवाणी होऊ नये यासाठी आवश्यक गोष्टी केल्या जातात. भावना दुखावतील म्हणून शिवाजी पार्क येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या हातातील तलवार काढून घेतली. चित्रपट पाहूनच योग्य अयोग्य भूमिका घ्यायला हवी. विरोध करणाऱ्यांनी भूमिका बदलून स्वागत करण्याची भूमिका घ्यावी... आणि मनगटात ताकद असली तर सिनेमागृहात जाऊन हर हर महादेव अशी जोरात आरोळी द्यावी..... हा चित्रपट इतिहासप्रेमींच्या हृदयात देशभक्तीची नवीन चेतना जागवणार आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या अजरामर शौर्याची, त्यागाची आणि स्वाभिमानाची प्रेरणादायी कहाणी या चित्रपटातून उलगडणार आहे. हा पण चांगला प्रयत्न आहे. देशाला कळेल छावा काय प्रकरण होते. "मृत्यूलामारण्याचेधाडसबाळगणारा, रणांगणातील झुंजार छावा.."स्वराज्यरक्षकछत्रपतीसंभाजीराजे. इतिहासप्रेमींच्याहृदयातदेशभक्तीचीनवीनचेतना जागवलीजाणारआहे. छत्रपतीसंभाजीमहाराजांच्याअजरामरशौर्याची, त्यागाची आणि स्वाभिमानाची प्रेरणादायी कहाणी या चित्रपटातून उलगडणार आहे. सुभेदार तान्हाजी चित्रपटात अजय देवगण यांनी पुण्यात समुद्र, नागीण तोफ, उदयभानू मुस्लिम पेहेरावत खुनशी असे इतिहासात न वाचलेले प्रसंग दाखवले होते, भव्यता दाखविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा चांगला वापर होतो आहे. ज्या परप्रांतीयांनी इतिहास वाचलाच नव्हता ती सुभेदारांची व्यक्तीरेखा आणि पराक्रम घराघरात पोहोचला.




## ममता कुलकर्णीने ५२ व्या वर्षी घेतला संन्यास

९० च्या दशकातील लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री ममता कुलकर्णी सध्या खूप चर्चेत आहे. त्याचं कारण म्हणजे तिने आता प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभ मेळयादरम्यान संन्यास घेतला. ती किन्नर आखाड्याची महामंडलेश्वर झाली आहे. संन्यासानंतर ममताचे नाव बदलण्यात आले. यापुढे ती श्री यमाई ममता नंद गिरी या नावाने ओळखली जाईल.

५२ वर्षीय ममता कुलकर्णीचं जन्म नाव पद्मावती कुलकर्णी आहे. तिने सिनेसृष्टीत येण्यासाठी नाव बदललं होतं. ममताचा जन्म २० एप्रिल १९७२ रोजी मुंबईत एका मध्यमवर्गीय मराठी ब्राह्मण कुटुंबात झाला. तिचे कुटुंब वर्सोवा भागात वास्तव्यास होते. मुंबईतील सेंट जोसेफ कॉन्व्हेंट हायस्कूलमधून शालेय शिक्षण पूर्ण करणाऱ्या ममताला अभिनयात फार रस नव्हता. मात्र तिने या क्षेत्रात यावं अशी तिच्या आईची इच्छा होती. ममता व तिची बहीण मुलिना कुलकर्णी दोघीही अभिनयक्षेत्रात आल्या.

ममताने १९९१ मध्ये 'नानबर्गल' या तमिळ चित्रपटातून करिअरला सुरुवात केली. त्याच वर्षी तिचा पहिला हिंदी चित्रपट 'मेरा दिल तेरे लिए' प्रदर्शित झाला होता. ममताने तिच्या करिअरमध्ये एकूण ३४ चित्रपट केले. 'आशिक आवारा', 'करण अर्जुन', 'नसीब', 'सबसे बडा खिलाडी', 'क्रांतीवीर', 'आंदोलन', 'छुपा रुस्तम', 'घातक', 'वक्त हमारा है', 'बाजी' हे तिचे गाजलेले चित्रपट आहेत. तिने हिंदीबरोबरच मराठी, तमिळ, बंगाली चित्रपटही केले. तिचा शेवटचा चित्रपट 'कभी तुम कभी हम' २३ वर्षांपूर्वी २००२ मध्ये प्रदर्शित झाला होता. डीएनएने मीडिया रिपोर्ट्सनुसार दिलेल्या माहितीनुसार, ममता कुलकर्णीची एकूण संपत्ती अंदाजे ८५ कोटी रुपये आहे. बॉलीवूडपासून दूर गेल्यानंतरही ती आर्थिकदृष्ट्या सक्षम होती. २००० मध्ये तिने इंडस्ट्री सोडली, त्यानंतर ती दुबईला निघून गेली. महिनाभरापूर्वी भारतात येण्याआधी ती दुबईत राहत होती.

## 'कन्यादान' फेम अभिनेत्याचा थाटामाटात पार पडला विवाहसोहळा!

मराठी कलाविश्वात सध्या लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. शाल्व-श्रेया, निखिल राजेशिर्के, रेश्मा शिंदे, कौमुदी वलोकर, किरण गायकवाड या कलाकारांच्या पाठोपाठ आता 'कन्यादान' मालिकेत झळकलेला लोकप्रिय अभिनेता लग्नबंधनात अडकला आहे. अभिनेत्याचे लग्नसोहळ्यातील फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

गेल्या महिन्याभरात अनेक मराठी कलाकारांनी लग्नगाठ बांधत वैयक्तिक आयुष्यात एका नव्या प्रवासाला सुरुवात केलेली आहे. यामध्ये आता आणखी एका अभिनेत्याचं नाव जोडलं गेलं आहे. 'कन्यादान' मालिकेत

### पत्नीचं सिनेविश्वाशी आहे खास कनेक्शन




झळकलेला अभिनेता देवेश काळे बोहल्यावर चढला आहे. देवेशने काही दिवसांपूर्वीच पत्नीसह समुद्रकिनारी रोमँटिक फोटो शेअर करत प्रेमाची जाहीर कबुली दिली होती. आता देवेश आणि सारिका लग्नबंधनात अडकले आहेत.

"घटस्फोट झाला असता", करीना कपूर संदर्भातील 'त्या' व्यक्तीच्या वक्तव्यावर शाहिद कपूर म्हणाला, "तिला कोण सहन करेल..."

देवेशने त्याची लग्नपत्रिका स्वत: डिझाइन केली होती. "आमची लग्नपत्रिका अशी झाली तयार, तुमच्यासाठी खास, प्रेमाने सजवलेली!" असं कॅप्शन देत लग्नपत्रिकेचा व्हिडीओ अभिनेत्याने सोशल मीडियावर शेअर केला होता. देवेश आणि सारिका या दोघांच्या नावांचं मिश्रण करुन लग्नात या जोडप्याने 'सारा का सारा देवेश' हा हॅशटॅग वापरला होता.


देवेश काळेची पत्नी सारिका भणगे ही प्रसिद्ध सेलिब्रिटी छाया चित्रकार आहे. लग्नसोहळ्यात या जोडप्याने पारंपरिक लूक केल्याचं पाहायला मिळालं. कलाविश्वातील बऱ्याच सेलिब्रिटींनी देवेश आणि सारिकाच्या लग्नाला उपस्थिती लावली होती. सध्या संपूर्ण कलाविश्वातून अभिनेत्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

दरम्यान, देवेश काळेच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर 'कन्यादान' या मालिकेसह देवेश 'पुष्पक विमान' आणि 'बांबू' या चित्रपटांच्या टीमसह देखील जोडला गेला होता. अभिनेत्याने भटकंतीची सुद्धा प्रचंड आवड असल्याचं त्याचं इन्स्टाग्राम प्रोफाइल पाहून लक्षात येतं. आता देवेश आणि सारिका लग्नबंधनात केव्हा अडकणार हे जाणून घेण्यासाठी त्यांचे चाहते आतुर आहेत.

## थलपती विजयच्या 'जन नायगन' सिनेमाचा फर्स्ट लूक रिलीज, दिसला हटके अंदाजात

अभिनेता आणि नेता थलपती विजयचा शेवटचा चित्रपट 'थलपती ६९'च्या निर्मात्यांनी टायटलसह फर्स्ट लूक पोस्टर रिलीज केले आहे. पोस्टरमध्ये अभिनेता गर्दीमध्ये सेल्फी घेताना दिसत आहे. एच.विनोद यांच्या दिग्दर्शनाखाली हा चित्रपट बनला असून या चित्रपटाचे नाव 'जन नायगन' ठेवण्यात आले.

निर्मात्यांनी केवीएन प्रॉडक्शनच्या अधिकृत X हँडलवर विजय थलपतीच्या बहुप्रतिक्षीत सिनेमाचे पोस्टर शेअर केले आहे. तसेच, निर्मात्यांनी पोस्टरसोबत कॅप्शनमध्ये लिहिले की, ''आम्ही याला जन नायगन, थलपथी 69 फर्स्ट






लूक म्हणत आहोत.'' 'जन नायगन'च्या फर्स्ट लूक पोस्टरमध्ये थलपती विजय एका उंच स्टेजवर आत्मविश्वासाने उभा राहून समर्थकांच्या गर्दीसोबत सेल्फी घेताना दिसत आहेत. हे पोस्टर त्याच्या सपोटर्ससाठी एक विशेष कनेक्शन म्हणून पाहिले जाऊ शकते.

**सिनेमाच्या नावाचा आहे हा अर्थ**

थलपती विजयच्या शेवटच्या चित्रपटाचे शूटिंग गेल्या वर्षी पारंपारिक पूजा समारंभाने सुरू झाले होते. चित्रपटाच्या निर्मात्यांनी त्याच्या X हँडलवर कलाकार आणि क्रू मेंबर्ससह अनेक फोटो शेअर केली होती. सुपरस्टार थलपती विजयच्या शेवटच्या चित्रपटाच्या नावाचा अर्थ लोकांचा नायक असा आहे.

**पूजेला हे कलाकारही होते उपस्थित**

पारंपारिक पूजा समारंभात थलपती विजय, बॉलिवूड अभिनेता बॉबी देओल आणि पूजा हेगडे आणि इतर कलाकार आणि क्रू सदस्य उपस्थित होते. या चित्रपटाचे शूटिंग नवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी सुरू झाले होते.

**हे स्टार्स दिसणार थलपतीसोबत**

थलपती विजय 'जन नायगन'मध्ये अभिनेत्री पूजा हेगडेसोबत पडद्यावर आदिसणार आहे. थलपती विजयच्या चित्रपटात पूजा हेगडेसह बॉबी देओल, गौतम वासुदेव मेनन, प्रकाश राज, नारायण, प्रियमणी, ममिता बैजू, मोनिशा ब्लेसी आणि वरलक्ष्मी सरथकुमार यांच्यासह इतर कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. थलपती विजयचा 'जन नायगन' सिनेमा १७ ऑक्टोबर रोजी तमिळ, तेलुगू तसेच हिंदीमध्ये प्रदर्शित होणार आहे.

## प्रवीण तरडेंनी स्वामी समर्थांना लिहिलं पत्र

'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या सिनेमाची सध्या सर्वत्र चर्चा आहे. आपण पाठवलेलं पत्र अमेरिकेला पोहोचतं, तर देवाच्या घरी नक्की पोहोचेल असं वाटणाऱ्या एका लहान निरागस मुलीचा देवाच्या घराचा शोध 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या चित्रपटातून उलगडणार आहे. या सिनेमाच्या निमित्ताने अनेक सेलिब्रिटी पत्रातून त्यांच्या भावना व्यक्त करत आहे. मराठी अभिनेता आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनीदेखील स्वामी समर्थांना पत्र लिहिलं आहे.

प्रवीण तरडेंचं स्वामी समर्थांना पत्र!
प्रिय स्वामी महाराज...
साष्टांग नमस्कार विनंती विशेष,
पत्रास कारण की,
खरं तर खूप दिवसांनी पत्र लिहितोय आणि त्याचं खास कारण आहे. मी आज 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या सिनेमाचा खास शो पाहिला. खूप दिवसांनी सिनेमा पाहताना रडलो. का रडलो माहीत नाही. महाराज, तो चित्रपट पाहताना क्षणाक्षणाला तुमची




आठवण येत होती. या चित्रपटातील एक चिमुकली देवाला पत्र लिहित असते. 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' असा पत्ता टाकते. आणि तिचं ते पत्र त्या देवाच्या घरी पोहोचण्यासाठी आणि त्या पत्त्यावर जाण्यासाठी ती आतोनात प्रयत्न करते. ज्या ज्या वेळी तिने पत्र लिहायला घेतलं, त्या त्या वेळी ते तुमच्यापर्यंत पोहोचलं असणारच. 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' हा पत्ता नाही तर हे ब्रह्मवाक्य आहे. त्यामुळे महाराज माझी विनंती आहे की ३१ जानेवारीला प्रदर्शित होणारा हा सिनेमा तुम्हीही पाहा. १० वर्षांपूर्वी मी देऊळ बंद सिनेमा केला होता. आज १० वर्षांनी महाराज मी त्याचा पुढचा भाग बनवतोय. पण, त्याआधी महाराज 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' हा सिनेमा पाहा. तोपर्यंत मी देऊळ बंदचा दुसरा भाग बनवायला घेतो.
तुमचाच,
प्रवीण विठ्ठल तरडे

'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या चित्रपटात ग्रामीण भागातली गोष्ट मांडण्यात आली आहे. सैन्यात असलेले वडील देवाघरी गेले असं आईनं मुलीला सांगितल्यावर देवाचं म्हणजे काय ? आणि ते कुठे असतं? याचा शोध सुरू होतो. चित्रपटाची कथा आणि दिग्दर्शन संकेत माने यांचे आहे. या चित्रपटात मायरा वायकूळ, मंगेश देसाई, कल्याणी मुळे, प्रथमेश परब, रेशम श्रीवर्धन, सविता मालपेकर, उषा नाडकर्णी, माधवी जुवेकर, कमलेश सावंत, स्पृहा परब, रुक्मिणी सुतार यांच्या मध्यवर्ती भूमिका असून अभिनेत्री पूजा सावंत ही पाहूण्या कलाकारच्या भूमिकेतून आपल्या भेटीस येणार आहे. हा चित्रपट येत्या ३१ जानेवारीला चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे.




**मेष** -तुमचे व्यक्तिमत्व आज एखाद्या अत्तरासारखे काम करील. तुम्ही प्रवास करणे आणि पैसे खर्च करण्याच्या मूडमध्ये असाल - परंतु नंतर त्याचे तुम्हाला दु:ख होईल.

**वृषभ** – आज तुम्ही एकदम शांततेत राहाल आणि मौजमजा करण्याचा तुमचा मूड बनेल.

**मिथुन** – आपली उद्दिष्टे अपेक्षा पूर्ण होण्यासाठी खाजगी संबंधांचा वापर आपल्या पत्नीस आवडणार नाही.

**कर्क** – आपल्यातील द्वेषपूर्ण दोष काढून टाकण्यासाठी समरसून जाणारी मैत्री करण्याचा गुण अंगी बाणवा.

**सिंह** – भावनांवर नियंत्रण ठेवणे कठीण होऊन बसेल - तुमचे अनपेक्षित वागणे तुमच्या अवतीभवतीच्या लोकांना गोंधळात टाकेल आणि तुम्हीसुद्धा निराश व्हाल.

**कन्या** – मनामध्ये सकारात्मक विचार चालू ठेवा. आकर्षक वाटणा-या योजनेत गुंतवणूक करण्यापूर्वी वरवर विचार न करता त्याच्या मूळाशी जा.

**तूळ** – प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. आपल्या अपेक्षेप्रमाणे पैसे मिळणार नाही.

**वृश्चिक** – हृदयरोग असणाऱ्यांनी कॉफी सोडण्याची तातडीची गरज आहे. यापुढेही असेच कॉफी घेत राहिलात तर आपल्या हृदयावर अनावश्यक दडपण येईल.

**धनु** – आज तुम्ही ऊर्जेने भरपूर असाल - तुम्ही जे काही कराल त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा निम्माच वेळ लागेल.

**मकर** – तुमचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यास लाभदायक दिवस. आई -वडिलांच्या आरोग्यावर तुम्हाला आज अधिक धन खर्च करावे लागू शकते.

**कुंभ** – स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भूत दिवस. आज तुम्ही त्या लोकांना उधार देऊ नका ज्यांनी तुमची मागील उधारी चुकवलेली नाही.

**मीन** – आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगला दिवस. तुमचे उल्हसित मन तुम्हाला योग्य ती ऊर्जा पुरवेल आणि आपणास आत्मविश्वास मिळवून देईल.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते संपन्न

## पालघर जिल्हा प्रगतीशील जिल्हा म्हणून आपली ओळख निर्माण करेल - पालकमंत्री गणेश नाईक

**पालघर (सतीश सोनावणे) -** शासनाच्या महत्त्वकांक्षी योजनेच्या माध्यमातून पालघर जिल्ह्यातील होत असलेल्या विकास कामांच्या व विविध प्रकल्पांच्या संदर्भात विचार करता आगामी काळामध्ये पालघर जिल्हा प्रगतीशील जिल्हा म्हणून आपली ओळख निर्माण करेल असा विश्वास वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केल.स्वातंत्र्य भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आज पालघर जिल्ह्याचा ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ पोलीस परेड मैदान, कोळगाव, जैनेसिस औदयोगिक परिसराच्या मैदानात वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी पालकमंत्री गणेश नाईक यांनी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, नागरिक, शासकीय अधिकारी , शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. या सामारंभास जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार राजेंद्र गावित, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, राज्य अनुसूचित जमाती आयोगाच्या सदस्या वैदेही वाढाण,निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे तसेच वरिष्ठ अधिकारी शालेय आणि महाविद्यालय विद्यार्थी , नागरिक उपस्थित होते.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस पालघर जिल्ह्यामध्ये प्रचंड



प्रतिसाद मिळाला असून या योजनेच्या माध्यमातून तळागाळातील खऱ्या अर्थाने गरजवंत असणाऱ्या जवळपास सहा लाख माता भगिनींना लाभ देण्यात आलेला आहे व आत्तापर्यंत सहा हप्त्यांमध्ये ही रक्कम अदा करण्यात आलेली आहे. राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळविण्याची क्षमता वाढविण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' निःशुल्कपणे कार्यान्वित करण्यात आलेली असून जिल्हा प्रशासनामार्फत १५३३ उमेदवारांना प्रशिक्षण देऊन रुपये २ कोटी २२ लाख इतके विद्यावेतन देखील अदा करण्यात आले असल्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले.

नुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) कायदा २००६ अन्वये जिल्ह्यामध्ये एकूण ३० हजार हेक्टर क्षेत्रावरील ५० हजार ६८७ वनहक्क दावे मंजूर करण्यात आलेले असून संपूर्ण देशात सर्वात जास्त वैयक्तिक वनहक्क दावे मंजूर करण्यात पालघर जिल्ह्याचा प्रथम क्रमांक लागतो.

देशाच्या व्यापार विकासात कच्च्या व पक्क्या मालाची आयात निर्यात करताना समुद्रकिनाऱ्यालगत मोठ्या बंदरांची निर्मिती व अन्य साठवण क्षमता असणारे लॉजिस्टिक पार्कची उभारणी आवश्यक ठरते. मुंबई व आसपासचे क्षेत्र भारताच्या उत्तर व दक्षिण भागाचा मध्यबिंदू असून आखाती व पश्चिमी देशांशी जोडले जाणारे महत्त्वाचे भौगोलिक केंद्र आहे. पालघर जिल्ह्यातील वाढवण येथे किनाऱ्यालगत नैसर्गिक २२ मीटर खोली असल्याने जगातील दहा मुख्य पोर्ट इतकी १५ टीईओ (तसेच वाढीव २३ टीईओ) कंटेनर क्षमतेचे बंदर विकसित करता येणार आहे. सदर बंदराला वाढवण तवा हा NH०८ ला जोडणारा ३४ किलोमीटर लांबीचा रस्ता बांधणे प्रस्तावित आहे.

SPORT

# Why Uzbekistan's Nodirbek Yakubboev refused to shake hands with R Vaishali at Tata Steel Chess tournament

**NEW DELHI :** Indian grandmaster Rameshbabu Vaishali recently defeated Uzbekistan's Nodirbek Yakubboev in the Challengers section of the 2025 Tata Steel Chess tournament in Wijk aan Zee, Netherlands. The two clashed in round four of the competition and Vaishali got the better of Nodirbek with black pieces.

However, that game was marred by controversy after Nodirbek declined Vaishali's offer for a handshake. In a video that has




gone viral on social media, Vaishali can be seen offering a handshake to Nodirbek before the contest, but Nodirbek refused to do so, just subtly waving his hand.

The 23-year-old Uzbekistani grandmaster later took to "X" to explain why he refused to shake hands with Vaishali. He said that he does not touch women due to religious beliefs.

I do not touch other women due to religious reasons': Yakubboev

Dear chess friends, I want to explain the situation that happened in the game with Vaishali. With all due respect to women and Indian chess players, I want to inform everyone that I do not touch other women for religious reasons," he wrote while tagging ChessBase India and Uzbekistan Chess.

He, however, added that he had utmost respect for Vaishali and R Praggnanandhaa, her brother who is also a grandmaster. "I respect Vaishali and her brother as the strongest chess players in India. If I have offended her with my behavior, I apologize. I have some additional explanations: 1. Chess is not haram."

"2. What I did before (referring to the game with Divya in 2023 and cases like that) I consider it wrong for me."

"3. I do what I need to do. I do not insist others not to shake hands with the opposite gender or for women to wear hijab or burqa. It is their business what to do," he added.

# Emma Raducanu loses first match since coaching split – and the brutal stats explain why

**NEW DELHI :** Emma Raducanu saw leads slip away in a painful three-set defeat at the Singapore Open in her first match since parting ways with coach Nick Cavaday.

The 2021 US Open winner fell 7-5, 5-7, 5-7 to world No 101 Cristina Bucsa in the opening round of the WTA 250 tournament in a contest lasting over three hours.

Raducanu recovered to win the first set after being a break down at 4-5, before her 27-year-old Spanish opponent levelled the match by edging an equally tight second set.

In the decider, Raducanu was up a break at 2-0 and 3-1, but she failed to consolidate her advantage as she was immediately broken back both times.



The 22-year-old Brit found herself with a 5-4 lead after Bucsa had been up a break at 4-3, but the Spaniard won the final three games to seal her passage to the second round.

Raducanu's performance was plagued by serving issues — and the numbers illustrate her struggles.

While she served seven aces, landed 73% of her first serves and won a solid 64% of the points when she did, it was her second serve that was a liability.

# Tilak Varma deserves praise for the coming-of-age, matching-winning knock

**NEW DELHI :** Thick, black shoulder-length hair, a stud on the left ear; a tall and wiry frame. When Tilak Varma stood with his arms aloft after taking a huge leap of joy, it was as if a warrior character from one of SS Rajamouli's blockbusters had come alive.

The bat and the helmet almost positioned like a sword and a shield only added to the theatre as he stood facing India's dressing room at the MA Chidambaram Stadium on Saturday. His teammates would stand and applaud, letting the 22-year-old soak in the moment before skipper Suryakumar Yadav walked in and bowed to Varma. The day's match-winners returned the gesture.

The unbeaten 72 from Varma wasn't even his career-best. During the recent tour of South Africa he had already scored two scintillating centuries to show the world that he is part of India's T20 future. But more than those two hundreds, there was something more to this knock against England. Not since this team under Suryakumar and Gautam Gambhir has come together have they played on a more challenging deck than this. Not even in Sri Lanka did they come across a two-paced pitch like they encountered at Chepauk.

India's batting in T20s has been breathtaking off-late, full of intent with all batsmen looking to attack from the first ball. They have manufactured shots out of deliveries that they previously had shown restraint to. This is a team that is liberated now. But there was this




one underlying question as to how they would respond should the conditions not let them free their arms as often as they like to. Such surfaces keep coming up every now and then, especially at the ICC events.

Boundary-less phases

And on Saturday when such a pitch was rolled out, none showed that they can go back to the old style, except Varma. He hasn't been part of the old set-up that knows how to take such games deeper by showing controlled aggression. In such games, it is often two or three big overs that tend to do the job instead of sustained aggression. Varma isn't used to those situations, yet when he came face-to-face with it, the left-hander didn't blink. An unbeaten 72 from 55 deliveries, though at a sedate strike rate of 130.90, saved the day for India. Nine balls without a boundary, then another boundary-less set of 14 balls and then another 14 in the death overs, Varma didn't go hammer and tongs during a mature innings.

"I know I can play both types of innings," Tilak said in the press conference. "I can hit with a good strike rate and also at 6 or 7 (an over), I can bat at a higher strike rate. That is what I have discussed with Gautam sir in the last match. He said that you can play with a good strike rate over 10 also and below 10 also. When the team requires, you should be flexible and I got the chance to prove it in this game," he added. With India losing wickets in the middle-overs, Varma by now was prepared to take the game deep. The explosive openers Sanju Samson, Abhishek Varma, captain Suryakumar Yadav, Dhruv Jurel and Hardik Pandya were back in the dugout by the 10th over, and over half the target still to get. When Gambhir came out for the drinks break, he would spell out his plans. "I said that I will be playing till the end. And that is what Gautam sir also said during the drinks break. He said that it is a time that you can show the people that you can play both the innings. So, I said that whatever happens I will be staying till the end and I want to finish the game," Varma said.

# Kansas City Chiefs takes on Philadelphia Eagles - Super Bowl 2025



**NEW DELHI :** Kansas City Chiefs will take on the Philadelphia Eagles in Super Bowl 2025 in New Orleans on February 9. It will be a rematch of the 2023 Super Bowl, which was held in Arizona. Kansas City aims to become the first team to win three Super Bowls in a row. Patrick Mahomes rallied the Chiefs to a 38-35 victory over the Eagles two years ago in Arizona and a 25-22 overtime win over San Francisco in Las Vegas last season.It will be the 10th Super Bowl rematch and fifth within a five-year span. The winners of the four rematches within five years were the teams that won the first meeting, including the Chiefs over the 49ers last season.There will be a lot of familiar faces for both teams in the rematch: Mahomes and Philadelphia quarterback Jalen Hurts are again under center. But there's some new blood, too, including Eagles running back Saquon Barkley, who ran for three TDs in the NFC title game.

# Improving mental toughness, monsoon base in Pondicherry & nurturing India ambitions

**NEW DELHI :** "Do not stop any practice session until you have achieved what you set out to gain from that particular day," Vidarbha's in-form Yash Rathod tells a trio of enthusiastic teens who approached the southpaw for batting inputs. The 24-year-old also offered to call up his veteran teammate Karun Nair from the dugout to get them more insights on the 'process'. "If you ask Karun bhai about something specific, maybe I'll also learn something new from the chat," Rathod tells the local Jaipur kids.



Rathod's hunger extends to team Vidarbha, the Ranji team which is geo-located at India's zero mile stone, but only recently been at the centre of cricketing excellence, previously overshadowed by Mumbai and Maharashtra in domestic cricket.

"The Indian system is so competitive that only fractions separate the top teams from the rest. At the right time, you have to be good," coach Usman Ghani says after Vidarbha's spotless day on the field. It is those decisive nuggets and fractions that Ghani and his bunch have polished and perfected over the last decade. The results have begun to show across the board where Vidarbha have progressively transformed from workaday participants to title contenders

On Sunday, last year's Ranji Trophy runner-ups became the first team to confirm their berth in the quarterfinals of the ongoing edition after producing a fourth-day outcome that looked improbable.

# मुंबई किनारी रस्त्याची उत्तर वाहिनी सोमवारपासून मुंबईकरांच्या सेवेत

## किनारी रस्त्यामुळे वेळ आणि इंधनाची बचत तर प्रदूषणापासून मुक्ती -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● मुंबई, विशाल कारंडे :

**धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्त्याच्या उत्तर वाहिनीचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज झाले. किनारी रस्त्यामुळे मुंबईकरांच्या प्रवासाच्या वेळेत तसेच इंधनामध्ये मोठी बचत होणार असून प्रदूषणापासून मुक्ती मिळण्यामध्ये हा मार्ग महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

सांस्कृतिक कार्य तथा माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव डॉ. अश्विनी भिडे, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अमित सैनी, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर आदी यावेळी उपस्थित होते.



यानिमित्त माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मुंबई किनारी रस्त्याचे 94 टक्के काम पूर्ण झाले असून आज उत्तरवाहिनी मार्गाचे उद्घाटन झाले आहे. प्रजासत्ताक दिनी हा मार्ग नागरिकांना समर्पित होत असून उद्या सोमवार दि. २७ जानेवारी पासून या मार्गासह अन्य तीन आंतरमार्गिका खुल्या होणार आहेत.

### दृष्टिक्षेपात प्रकल्प...

- धर्मवीर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारा रस्ता दक्षिण या मार्गाचे लोकार्पण झाले. यामुळे मरीन ड्राइव कडून सागरी सेतूकडे जाणारी वाहतूक उत्तर वाहिनी पुलावरून सुरू होणार.
- मरीन ड्राईव्हकडून प्रभादेवीकडे जाण्यासाठी आंतरमार्गिका सुरु होणार. मरीन ड्राईव्हकडून बिंदू माधव ठाकरे चौकाकडे जाणारी आंतरमार्गिका सुरू होणार.
- बिंदू माधव ठाकरे चौकातून सागरी सेतूला जोडणारी आणि वांद्रेच्या दिशेने जाणारी आंतरमार्गिका देखील सुरू होणार.
- वाहतूक स्थिती : १२ मार्च २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत ५० लाख वाहनांचा प्रवास तर दररोज सरासरी १८ ते २० हजार वाहनांचा प्रवास.
- धर्मवीर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पामधील महत्त्वाचा टप्पा म्हणजे मुंबई किनारा रस्ता प्रकल्प व वरळी-वांद्रे सागरी सेतूला जोडणारा पुल. या पुलाची एकूण लांबी ८२७ मीटर असून वजन २४०० मेट्रीक टन इतके आहे.
- धर्मवीर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) हा प्रकल्प शामलदास गांधी मार्ग (प्रिन्सेस स्ट्रीट) उड्डाणपूल ते वांद्रे-वरळी सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंत बांधण्यात येत आहे.

आजतागायत या प्रकल्पाचे ९४ टक्के काम पूर्ण झाले आहे.

# सातारा शहरातील नूतन पालकमंत्र्यांच्या स्वागताचे बॅनर २४ तासातच नाहीसे...

● सातारा, दिगंबर जाधव:

महाराष्ट्र राज्याचे पर्यटन, खाण व माजी सैनिक कल्याण कॅबिनेट मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार शंभूराज देसाई यांच्या स्वागताचे सातारा शहराच्या रस्त्यावर बॅनर लावण्यात आले होते. कोणतीही परवानगी न काढता लावलेले बॅनर सातारा नगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने २४ तासातच नाहीसे केले आहे. डी.जे .चा आवाज येतो पण देवाच्या काठीचा आवाज येत नाही. अशी प्रतिक्रिया उमटली आहे.

याबाबत माहिती अशी की, सातारा जिल्हा पालकमंत्री पदी निवड झाल्यानंतर सर्वच प्रथम सातारा जिल्ह्यात आगमन झालेल्या नामदार शंभूराज देसाई यांचे शिरवळ पासून ते त्यांच्या निवासस्थानापर्यंत अनेकांनी त्यांचे स्वागत केले. पेढे तुला केला. सातारा शहरातील पोवई नाक्यावर मोठ्या आवाजात डी.जे. लावण्यात आल्याने पालकमंत्र्यांच्या कानठळया बसल्या होत्या. पण, कर्तव्यदक्ष व कायदा सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिसांनी त्याकडे कानाडोळा केला. याबाबत काही जागरूक प्रसार माध्यमाने प्रश्न उपस्थित केल्यानंतर पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी सारवासारव केली. स्वातंत्र्यदिनानिमित्त रस्त्याच्या दुभाजकामध्ये तिरंगी विद्युत रोषणाई साठी ठेकेदार नेमले



होते. परंतु ,रस्त्यावरच्या दुभाजकाच्या ठिकाणी व रस्त्याच्या लगत पालकमंत्री शंभूराजेंच्या स्वागताचे व अभिनंदनचे बॅनर लावण्यात आले होते. कोणतीही पूर्व परवानगी न करता लावलेले बॅनर अखेर सातारा नगरपालिका अतिक्रमण विभागाने २४ तासाच्या आतच नाहीसे केले.

वास्तविक पाहता सातारा जिल्हा पालकमंत्री पदी शंभूराज देसाई यांची निवड झाल्यामुळे सातारा शहरातील नव्या जुन्या भाजपमधील एका गटाने तीव्र नाराजी व्यक्त केली होती. सध्या साताराचे खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले व सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या माध्यमातून सातारा नगरपालिकेमध्ये सत्ता आहे. त्यामुळे नामदार शंभूराज देसाई यांचे बॅनर अतिक्रमण विभागाने काढण्याचे धाडस केल्याबद्दल अनेकांनी त्यांचे कौतुक केले आहे. वास्तविक पाहता पूर्वपरवानगीशिवाय हे बॅनर लागलेच कसे? बॅनर लावताना अतिक्रमण विभाग डोळे झाकून होते का? यानिमित्त सर्वसामान्य जनता प्रश्न उपस्थित करत आहे. सातारा नगरपालिकेच्या कारभाराबाबत अनेक कार्यकर्त्यांनी आंदोलन केले पण त्यामध्ये सुधारणा झालेली नाही. याकडेही आंदोलकांनी लक्ष वेधून सातारा नगरपालिकेच्या कारभाराबाबत कभी खुशी कभी गम नक्कीच आहे अशी प्रतिक्रिया दिली आहे.

# वाघांच्या नंदनवनातून कुख्यात शिकारी अजित राजगोंडला अटक


● चंद्रपूर, नितीन देवळेकर :

वाघांच्या शिकारीसाठी कुख्यात असलेल्या बहेलिया टोळीतील अजित राजगोंड याला चंद्रपूरातील जंगलातून अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यात झालेल्या अनेक वाघांच्या त्यानं शिकारी केल्याचा संशय आहे. अशातच वाघांसाठी नंदनवन ठरलेल्या चंद्रपूरातून त्याला अटक करण्यात आल्यानं एकच खळबळ उडाली आहे. वनविभागाने याची पुष्टी केली असून या प्रकरणी त्याची चौकशी सुरू आहे. चंद्रपूर जिल्ह्यात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ताडोबा अंधारी व्याघ्रप्रकल्पासह परिसरात १०० हून अधिक वाघ आहेत. त्यामुळे येथे मानव-वन्यजीव संघर्ष शिगेला पोचला आहे. अशातच वाघांच्या शिकारीसाठी कुख्यात असलेला आरोपी अजित राजगोंड याला चंद्रपूर जिल्ह्यात पकडण्यात आलं. वाघांच्या शिकारीसाठी कुख्यात असलेला आरोपी अजित राजगोंड हा चंद्रपूरात सापडल्यानं वनविभागाला सखोल तपास करावा लागणार आहे. मध्यप्रदेश येथील बहेलिया टोळी ही वाघांच्या शिकारीसाठी कुख्यात आहे. वाघांची शिताफीनं



शिकार करण्यात ही टोळी तरबेज आहे. या टोळीनं देशभरातील अनेक वाघांची शिकार केली आहे. एवढंच नव्हे तर या टोळीचं आंतरराष्ट्रीय कनेक्शन असल्याचंही समोर आलं. २० वर्षांपूर्वी चंद्रपूर जिल्ह्यात बहेलिया टोळीचा वावर होता. त्यानंतर त्यांचं अस्तित्व फारसं दिसून आलं नाही. असे असले तरी तरीही चंद्रपूर जिल्ह्यात काही ठिकाणी वाघांची शिकार झाल्याचं समोर आलं होतं. २०२१ मध्ये वाघांच्या अवयवाची तस्करी करताना नागपूर येथील बुट्टीबोरी वनविभागानं काही आरोपींना अटक केली होती. या तपासात जिल्ह्यात पोंभुरणा, सिंदेवाही या परिसरात वाघांची शिकार करण्यात आल्याचं निष्पन्न झालं होतं. डिसेंबर महिन्यात दोन आरोपींना लोहारा येथून अटक करण्यात आली होती.

# 'नीट'च्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरुपात बदल




● मुंबई, विशाल पाटील

वैद्यकीय पदवी प्रवेश परीक्षेची (नीट) प्रश्नपत्रिकेचे स्वरुप बदलण्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा एजन्सीकडून (एनटीए) घेण्यात आला आहे. त्यानुसार आता परीक्षेतील पर्यायी प्रश्न वगळण्यात आले असून प्रश्नपत्रिका १८० प्रश्नांची असणार आहे. ही प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना तीन तासांचा कालावधी मिळणार आहे.

करोना कालावधीमध्ये विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत परीक्षेचे स्वरूप बदलण्यात आले होते. मात्र आता परीक्षा जुन्याच पद्धतीनुसार घेण्याचा निर्णय एनटीएने घेतला आहे. करोना कालावधीमध्ये विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने नीट यूजीच्या परीक्षेत बदल करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार नीट यूजीच्या परीक्षेमध्ये 'अ' व 'ब' असे दोन विभाग करण्यात आले होते. 'अ' विभागात ३५ अनिवार्य प्रश्न होते, तर 'ब' विभागामध्ये १५ पर्यायी प्रश्न होते. मात्र करोनाचा प्रादुर्भाव संपुष्टात आल्याने एनटीएने परीक्षा मूळ पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे.

या पद्धतीत प्रश्नपत्रिकेतून 'ब' विभाग काढून टाकण्यात येणार असल्याने पर्यायी प्रश्न नव्या प्रश्नपत्रिकेतून वगळण्यात येणार आहेत. त्यामुळे यापुढे नीट १८० अनिवार्य प्रश्नांची असेल. त्यात भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रातील प्रत्येकी ४५ प्रश्न आणि जीवशास्त्रातील ९० प्रश्न असतील. हे प्रश्न सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना १८० मिनिटांचा म्हणजे तीन तासांचा कालावधी दिला जाणार आहे. तसेच करोनामध्ये परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना देण्यात आलेला अतिरिक्त कालावधीही कमी करण्यात आला आहे.

### प्रश्नपत्रिका नमुना:

- प्रश्नपत्रिकेत 180 अनिवार्य प्रश्न असतील.
- पर्यायी प्रश्नांची तरतूद वगळली
- परीक्षेचा एकूण कालावधी १८० मिनिटे (३ तास)

# नागोठणे ग्रामपंचायत हद्दीत स्मार्ट मिटरला नो एंट्री! ग्रामस्थांच्या हितासाठी ग्रामसभेत ठराव मंजूर

● नागोठणे, फरीद डावरे :

महाराष्ट्र वीज वितरण कंपनी टेंडर प्रक्रिया राबवून राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील घराघरात स्मार्ट मिटर बसविण्याची लगीनघाई संबंधित ठेकेदारांकडून सध्या सर्वत्र सुरु आहे. तर दुसरीकडे शहरी भागांसह ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेला होणारा त्रास लक्षात घेता या स्मार्ट मीटरला तिव्र विरोध होत असतानाच नागोठणे येथील सूज्ञ नागरिक सामाजिक कार्यकर्ते सगीरभाई अधिकारी यांच्याकडून मांडण्यात आलेल्या स्मार्ट मीटर विरोधातील सुचनेनुसार ग्रामसभेतील उपस्थित सर्वच नागोठणेकर नागरिकांनीही ग्रामपंचायत हद्दीत लावण्यात



येणाऱ्या स्मार्ट मीटर जोरदार विरोध केल्याने शिवसेना नेते किशोरभाई जैन यांच्या मार्गदर्शनाखालील ग्रामसभेचे अध्यक्ष सरपंच सुप्रिया महाडिक, उपसरपंच अखलाक पानसरे, पहिले लोकनियुक्त सरपंच तथा सदस्य डॉ. मिलिंद धात्रक यांच्या उपस्थितीत नागोठणे ग्रामपंचायत हद्दीत स्मार्ट मीटरला नो एंट्री असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे. दरम्यान स्मार्ट मीटरमुळे सर्वसामान्य जनतेला आपले जीवन जगणे फार कठीण होईल म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात स्मार्ट मिटर विरोधात मोहीम चालू असून नागोठणे ग्रामपंचायत हद्दीत स्मार्ट मिटर कोणाच्याही घरात लागता कामा नये व जेथे जेथे लागले असतील ते काढून टाकण्यात यावेत अशा सूचना नागोठणे ग्रामपंचायतीने नागोठणे वीज वितरण कंपनीला द्याव्यात असा ठराव सामाजिक कार्यकर्ते सगिर अधिकारी यांनी आजच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त झालेल्या ग्रामसभेत मांडल्यानंतर उपस्थित ग्रामस्थांनी टाळया वाजवून अनुमोदन दिले त्यानंतर त्या ठरावाला तात्काळ ग्रामसभेत मंजुरी मिळाली व हा ठराव रेकॉर्डवर घेण्यात आला आहे. तसेच ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक शिवसेना नेते किशोरभाई जैन यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामसभेचे अध्यक्ष सरपंच सुप्रिया महाडिक यांच्यावतीने पहिले लोकनियुक्त सरपंच तथा सदस्य डॉ. मिलिंद धात्रक यांनी ग्रामसभेत ग्रामस्थांनी मांडलेल्या विविध समस्यांचे समाधानकारक उत्तर देऊन निरसन केल्यामुळे उपस्थित ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. यावेळी ग्रामसभेत किशोरभाई जैन यांनी मार्गदर्शन करताना सांगितले कि, ग्रामस्थांनी जेजे विषय घेतलेले आहेत ते सर्व विषय चांगले असून ते सर्व विषय रेकॉर्डवर घेण्यात आले आहेत. महामार्गाच्या ज्या काही समस्या आहेत त्या सोडविण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन लढा दिला पाहिजे. महामार्गावर होत असलेले अपघात रोखण्याची पूर्णतः जबाबदारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, त्यांना नेमून दिलेले ठेकेदार यांच्यासह पोलिसांची आहे.

# गोड्या पाण्यातील मासेमारी वाढवण्यासाठी धोरण तयार करावे – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मत्स्य व्यवसाय विभागाच्या १०० दिवसाच्या नियोजनाचा घेतला आढावा

● मुंबई, राकेश गायकवाड :

राज्यात गोड्यापाण्यातील खंडांतर्गत मासेमारीला मोठा वाव आहे. सध्याच्या खंडाअंतर्गत मासेमारीमध्ये वाढ करण्यासाठी धोरण निश्चित करावे. तसेच मत्स्यबीज मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होण्यासाठीही धोरण तयार करावे, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे मत्स्य व्यवसाय विभागाच्या १०० दिवसांच्या नियोजनाचा मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सविस्तर आढावा घेतला



त्यावेळी त्यांनी सूचना केल्या.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, खंडांतर्गत मत्स्य व्यवसाय वाढवणे गरजेचे आहे. गोड्या पाण्यातील मासेमारीसाठी मत्स्यबीज उपलब्धता अत्यंत महत्वाचे आहे. मत्स्यबीज उपलब्धता वाढविण्यासाठी ध्येयात्मक काम करावे. ज्या ठिकाणी राज्यात मत्स्य बीज प्रक्रियेविषयी चांगले काम होत आहे. त्यांना प्रोत्साहन आणि निधी देण्यात यावा. त्यासोबतच सागरी मासेमारी विषयी सर्वसमावेशक धोरण तयार करावे. केंद्र शासनाने मत्स्य व्यवसायास कृषी व्यवसायाचा दर्जा दिला आहे. केंद्राच्या नियमानुसार राज्यातील मत्स्य व्यावसायिकांना लाभ देण्याची कार्यवाही करावी. धरण क्षेत्रातील मासेमारी व्यवसायासाठीही सर्वसमावेशक धोरण तयार करावे. मासेमारी संस्थांचा कारभार पारदर्शक राहील असे पहावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या. मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन, यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे विभागाची माहिती सादर केली. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना यासह सागरी क्षेत्रात होणारे ड्रोन सर्वेक्षण, मासेमारी बोटी व मत्स्य व्यवसायिकांना देण्यात येणारे अनुदान व सोयी सुविधा, मत्स्य व्यवसाय वाढीसाठी उभारण्यात येत असलेल्या मत्स्य बंदर, मत्स्य बाजार, मरोळ येथील आंतरराष्ट्रीय मत्स्य बाजार यासारख्या सुविधांचीही माहिती देण्यात आली.

# साताऱ्यात पीएनजी ज्वेलर्सचे ५०वे दालन सुरू!

● सातारा, दिगंबर जाधव:

महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय आणि विश्वासार्ह पारंपरिक ज्वेलर्स, पीएनजी ज्वेलर्स यांनी ऐतिहासिक सातारा शहरात आपल्या नव्या दालनाचे उद्घाटन करून प्रादेशिक ज्वेलरी बाजारात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. या नव्या दालनामुळे पीएनजी ज्वेलर्सची एकूण ५० दालनांची संख्या पूर्ण झाली असून हा ब्रँड आता जागतिक पातळीवर एका नव्या टप्प्यावर पोहोचला आहे. २४ जानेवारी २०२५ रोजी सुप्रसिद्ध अभिनेते स्वप्नील जोशी यांच्या हस्ते सातारा येथील दालनाचे उद्घाटन करण्यात आले. पीएनजी ज्वेलर्सने मागील काही महिन्यांपासून त्यांच्या विस्तार धोरणाचा वेग वाढवला आहे. २०२४ च्या नवरात्रीत सलग ९ दिवसांत ९ नवीन दालने सुरू करण्याचा विक्रम पीएनजी ज्वेलर्सने रचला होता. त्यानंतर १० जानेवारी २०२५ रोजी माधुरी दीक्षित यांच्या उपस्थितीत सोलापूरमध्ये भव्य दालनाचे उद्घाटन करण्यात आले. पीएनजी ज्वेलर्सच्या या नियोजित विस्तारतून दिसून येते की, द्वितीय आणि तृतीय श्रेणीत येणाऱ्या शहरांमधील ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडींना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अशा शहरांमध्ये दागिन्यांच्या आणि इतर लक्झरी वस्तूंच्या वाढत्या मागणीमुळे ही ठिकाणे भविष्यातील प्रमुख खरेदी केंद्र बनतील.



१९३ वर्षांची परंपरा, ३० लाखांहून अधिक ग्राहक, आणि पिढ्यानपिढ्या टिकवलेला विश्वास ही पीएनजी ज्वेलर्सची ओळख आहे. भारतासह यूएसएमध्येही पीएनजी ज्वेलर्स आजघडीला घराघरात पोहोचला आहे.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, "पीएनजी ज्वेलर्सने ५० दालनांचा टप्पा गाठल्याचा आम्हाला अतिशय आनंद आहे.